# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००८ |
| वर्ष | : | दहावे |
| अंक | : | १ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १३६**

MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष दहावे / अंक १ / डिसेंबर २००८

## संपादकीय

## आर्थिक मंदी व समाज

समाजाचा विकास, सांस्कृतिक पुढारलेपण मोजण्याची पारंपरिक अशी काही परिमाणे आहेत. या परिमाणांमध्ये आर्थिक क्षमता हे एक महत्त्वाचे परिमाण मानले जाते. गेले दोन महिने संपूर्ण जग वित्तीय दहशतीच्या सावटाखाली आहे. या आर्थिक मंदीची विश्लेषणे जगभर चालू आहेत. आर्थिक क्षमता जास्त, म्हणजे विकास चांगला असे मानले जाते. वास्तविक हे दिशाभूल करणारे ठरू शकते. एखाद्या गोष्टीच्या वास्तव रूपापेक्षा तिची भीती दाहक असू शकते. आर्थिक समृद्धी ही चांगलीच बाब आहे. फक्त ती साध्य करण्याचे मार्ग कोणते आहेत, कोणते असावेत हे अधिक महत्त्वाचे आहे.

गेल्या तीन - चारशे वर्षांत पाश्चात्त्य संस्कृतीची जडणघडण झाली. तिचा डोळसपणे विचार केला तर पंधराव्या शतकात आर्थिक क्षमतांच्या विचारांना ठळकपणे सुरुवात झाल्याचे दिसते. प्रबोधनाच्या या कालखंडात ख्रिस्त्री धर्मपंथात असणारा धर्मांधपणा समाजाच्या प्रगतीच्या आड येऊ लागल्याचे आढळून येते. या जाणिवा वाढत गेल्या तसे ख्रिस्ती पंथ व प्रबोधन यात द्वंद्व निर्माण होऊ लागले. सामाजिक शास्त्रे, विज्ञान, सर्व कला या क्षेत्रांत एक नवीन विचारप्रवाह येऊ लागला. परिणामी वैज्ञानिक क्रांती, औद्योगिक क्रांती यांना पूरक ठरेल अशी क्रांती अर्थ विचारांत झाली.

एकोणिसाव्या व विसाव्या शतकात या नवीन विचारप्रवाहात मार्क्सवाद व भांडवलवाद हे दोन अर्थप्रवाह सामील झाले. यांची निर्मिती औद्योगिक क्रांतीवर आधारित होती. विसावे शतक हे साम्यवाद व समाजवादाचा विकास होण्याचा काळ होता. त्याचवेळी भांडवलवादाचाही विकास झाला.

ज्या देशांनी समाजवाद वा साम्यवाद स्वीकारला, त्यांचे आर्थिक दिवाळे निघाले. यातूनच पुढे संस्कृतीचा ऱ्हास झाला. सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याची गळचेपी झाली. परिणामी अशा राष्ट्रांची सृजनशीलता कमी होत गेली. रशिया व चीन ही त्याची उदाहरणे आपण जाणतोच. एकेकाळची कट्टर साम्यवादी असणारी ही राष्ट्रे होती. आज ती भांडवलशाही अर्थरचना राबवताना दिसतात; इतकेच नाही तर आपल्या सामाजिक चेहऱ्यातही त्यानुसार बदल घडवताना दिसत आहेत. भांडवलवाद स्वीकारलेल्या अमेरिका युरोपातील राष्ट्रांच्या आर्थिक समृद्धीसाठी पुराव्यांची गरज नाही. अर्थात या विकासाला सृजनशीलतेबरोबरच आर्थिक भांडवलाचा हातभार लागला. या राष्ट्रांतील जनतेला मुबलक स्वातंत्र्य मिळाले. त्यामुळे विज्ञानापासून कलेपर्यंतची सर्व क्षेत्रे या राष्ट्रांनी पादक्रांत केली.


साहजिकच ही राष्ट्रे या सैद्धांतिक विचारसरणीची भलावण व विरोध यानुसार राजकीय गटबाजीत विभागली गेली.

(मल पृष्ठ क्रमांक ३ वर)

## आम्ही आशा सोडलेली नाही ---

२६ नोव्हेंबर दोन हजार आठ,
अतिरेक्यांनी केले लक्ष्य सी.एस्.टी., ओबेरॉय आणि ताज
अतिरेक्यांच्या बंदुकीतून सुटलेल्या गोळीला
नव्हते कसलेच भान,
तिला ना होते डोळे ना कान
नव्हते तिला निश्चित लक्ष्यही
तिला एकच ठाऊक होते,
रक्ताच्या लालभडक रंगाने न्हाऊन जायचे
ती जाणत नव्हती जात, धर्म,
लिंग, वय, गरीब, श्रीमंत
नव्हता कसलाच भेदभाव तिच्याजवळ
आम्हीही हतबल, दूरदर्शनवर क्रूरतेचा नंगानाच पहाणारे,
आमच्या पुढच्या पिढीच्या, चिमुकल्यांच्या डोळ्यांत
दिसले आम्हांला अतिरेक्यांबद्दलचे भय,
राजकारण्यांबद्दलचा तिरस्कार
पण त्याच डोळ्यांत दिसला आम्हांला
आमच्या जवानांबद्दलचा अभिमान!
म्हणूनच आम्ही आशा सोडलेली नाही ---
निर्लज्ज राजकारण्यांना करू द्या
त्यांचं खुर्चीचं राजकारण
गेंड्याच्या कातडीसह राहू द्या त्यांना
आपल्याच कोशात
आमचे पोलीस, आमचे जवान, आमचे कमांडोज्
पाहिलंय आम्ही त्यांना जीवानची बाजी लावताना
म्हणूनच, चिमुकल्यांच्या मनावरचे
निराशेचे काळे ढग
दूर सारता येतील आम्हांला
त्या ढगांमधून उगवेल,
उद्याचा तेजस्वी भारतसूर्य
म्हणूनच म्हणतो,
आम्ही अजून आशा सोडलेली नाही---!

मैत्रेयी शेवडे
(अध्यापिका - आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा, मा. विभाग)




**वर्ष दहावे / अंक ७ / डिसेंबर २००८**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा.. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १० वे / अंक ६ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४१२९१**
**२५४१३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | गीता आणि दैनंदिन जीवन | श्री. शं. बा. मठ | ३ |
| २) | ''वासांसि जीर्णानि यथा विशय...'' | आशा भिडे | ७ |
| ३) | ऊरूम्ची: वाळवंटातील नंदनवन | डॉ. सुधाकर आगरकर | ११ |
| ४) | शुद्ध भाव | श्री. यशवंत माने | १४ |
| ५) | त्रैभाषिक महाकोश शब्दानंद | श्री. शरद जोशी | १५ |
| ६) | श्री देवी माहात्म्य | आशा भिडे | १७ |
| ७) | भारतीय संस्कृती -बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | १९ |
| ८) | मराठी वर्णक्रम नियमावली | प्रा. श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये | २४ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३२ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षणक्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान विधी व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

टी.व्ही., व्हिडिओ, सिनेमा व तत्सम नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन किंवा या मासिकात जाहिरात देऊन आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

अंकाची किरकोळ
विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठविताना आपला
पूर्ण पत्ता, पिन कोड व
दूरध्वनी कळवावा.

संपादक, दिशा
**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.४०० ६०२**
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**टीप** : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) **''विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा''** या नावाने पाठवावा.

# गीता आणि दैनंदिन जीवन

*संतांच्या जीवनचरित्रांचा परिचय झाल्यानंतर दिशाच्या वाचकांसाठी श्री. शंकरराव मठ यांची ही 'गीता' विषयक लेखांची मालिका या अंकापासून सुरू करत आहोत - संपादक*

**गीता ग्रंथ :**

समतोल जीवन निर्माण करण्याची प्रेरणा देणारा ग्रंथ म्हणजे गीता होय. दैनंदिन जीवन जगत असताना सर्वच व्यवहार उत्तम व उदात्त करता येतात, असे प्रतिपादन करणारा ग्रंथ म्हणजे गीता होय. प्रत्येक कर्म ही परमात्म्याची सेवा असून माझ्या हातून जे काही घडते ती त्याची पूजा होय अशी मनाची धारणा असणे आवश्यक. अशा रीतीने वागणाऱ्या सामान्य माणसाच्या दैनंदिन व्यवहारातून देखील कल्याण साधता येते. गीता हा ग्रंथ सर्व समावेशक असल्याने त्याचा हा दृष्टिकोन उदार आहे म्हणजे विश्वव्यापक आहे. मानवाला आपल्या एकट्याचेच कल्याण साधून चालणार नाही तर त्याच बरोबर त्याला सामाजिक कल्याणही साधता आले पाहिजे. हे साधण्यासाठी व्यक्तिगत जीवन केवळ विशुद्ध चारित्र्याने आणि सद्गुणाने संपन्न करून न थांबता त्यांच्या द्वारे आत्यंतिक कुशलता प्राप्त करून घेऊन व्यवहार करणे आवश्यक आहे. तरच विश्वात यशस्विता आणि जीवनात सौख्य निर्माण करणे शक्य होईल व जीवन एकांगी न होता सर्वांशाने विकसित होईल. असा सर्वांगीण विकास गीतेला अभिप्रेत आहे. धर्म आणि व्यवहार, श्रद्धा आणि बुद्धि, नीती आणि तत्त्वज्ञान, ध्येय आणि आचार, ऐहिक आणि पारलौकिक या सर्वांचा मेळ घालून जीवन सर्वांगीण, सर्वंकष बनविणारा ग्रंथ म्हणजे गीता होय.

**वैज्ञानिक दृष्टी :**

प्रखर बुद्धिनिष्ठा हेच विज्ञानाचे एकमेव साधन आहे. विज्ञानामुळे मानव अधिकाधिक बुद्धिनिष्ठ झालेला आहे. तो तर्क कठोर बनत आहे. विज्ञानाचा हेतू सत्यान्वेषण हाच आहे. सत्य म्हणजे जे प्रत्ययाला येते ते. त्यालाच वैज्ञानिक सत्य म्हणून स्वीकारतो. त्याचा कल वस्तुनिष्ठतेकडे असतो. स्वत:ची बुद्धी निर्भेळ राहावी याची तो जपणूक करतो. ती पूर्वग्रहदूषित होऊ नये अगर रूढी, परंपरा यांना बळी पडू नये याची तो कसोशीने काळजी घेतो. प्रत्येक गोष्ट तो स्वत: तपासून पाहातो. त्या संबंधीचा प्रयोग तो स्वत: करतो. इतरांवर विसंबून राहात नाही. सतत सत्य शोधन करीत राहाणे आणि प्रयोगांतून प्रतीतीला येणाऱ्या सत्यतेचा स्वीकार करणे एवढेच तो जाणतो. जुने आणि अनुपयुक्त टाकून देण्यात त्याला कसलीच अडचण वाटत नाही. केवळ एखाद्याचे मत व ऐकीव माहिती याची स्वीकृती तो कधीच करीत नाही. गीतेचा अभ्यास करताना जीवनात उभ्या ठाकलेल्या प्रसंगाला यथोचित सामोरे जाणाऱ्या अर्जुनाच्या ठिकाणी ही वैज्ञानिक दृष्टी असावी असे म्हणावेसे वाटते. गीताग्रंथावरून ही गोष्ट आपणास पाहावयास मिळते.

गीता ऐकण्यापूर्वी अर्जुनाच्या मनात काही ठाम विचार होते. मात्र त्याने लक्षपूर्वक व मोकळ्या मनाने श्रीकृष्णाचे म्हणणे ऐकून घेतले. त्याला प्रश्न विचारून आपल्या मनातील शंकांचे निरसन करून घेतले. असे करूनही त्याचे समाधान झाले नाही. केवळ शद्ब ज्ञानाने समाधान न झाल्याने त्याची प्रचीती घेण्याचा मानस त्याने श्रीकृष्णापुढे व्यक्त केला. श्रीकृष्णाने आनंदाने त्याला विश्वरूप दर्शन घडविले. अर्जुनाला विराट स्वरूपाचे दर्शन घडले. त्या विराटात सारे काही एकवटलेले आहे हे अर्जुनाला पाहावयास मिळाले. या नंतरच अर्जुनाने

श्रीकृष्णाचे वचन स्वीकारार्ह असल्याचे ठरविले.

**बुद्धियोग :**

श्रीकृष्णांनी अर्जुनाला सर्व प्रथम बुद्धियोग शिकविला. कारण सर्व साधनात बुद्धी हीच उत्तमोत्तम साधन म्हणून मानवाला प्राप्त झालेली आहे. श्रीकृष्ण म्हणतात - अर्जुना मी तुला सांख्य म्हणजे ज्ञान सांगितले. (बुध्दया 'युक्तः कर्मबन्धं प्रहास्थासि। गी. २/३९) बुद्धीच्या कक्षा विस्तारित करण्यावर गीता सर्वांत अधिक भर देते. ती बुद्धी दैवी युक्तीच्या आधारे विकसित व्हावी अशी गीतेची शिकवण आहे. वेद, गुरू, विद्वान् ही सारी केवळ मार्गदर्शक आहेत. या नंतरचा प्रवास ज्याचा त्यालाच करावा लागतो. या साऱ्या गोष्टींचा तू नीट विचार कर व मनाला जे योग्य वाटते त्या प्रमाणे वाग. (यथेच्छसि तथा कुरु। गी. १८.६१)

**गीतेची शिकवण सार्वकालीन आणि सार्वदेशिक:**

गीतेतील शिकवणीची व्याप्ती विशाल आहे. ती स्थल कालातीत आणि सर्व मानवांना उपयुक्त अशी आहे. तिचा स्वीकार सर्वांनाच करता येण्यासारखा आहे. गीतेला अखिल मानवाचे कल्याण अभिप्रेत आहे. श्रीकृष्ण भक्त अगर तत्सम मानवाचेच कल्याण होईल असे नसून जे कोणी या शिकणुकीप्रमाणे आचारण करतील त्या सर्वांचे कल्याण गीतेला अभिप्रेत आहे. (संसिध्दिम् लभते नर:।) मात्र गीता वारंवार सांगते की, सर्व कर्म यज्ञमय करावे. त्या वाचून होणारे कर्म बंध निर्माण करते. आसक्तिविरहित होऊन कर्म कर, ही गीतेची मुख्य शिकवण आहे. (यज्ञार्थात् कर्मणोऽन्यत्र, लोकोऽयं कर्मबंधन:। गी. ३.९, मुक्त संग: समाचर। जी. ३.९) असे कर्म सर्व लोकांच्या हिताला कारणीभूत होते. (सर्व भूत हितेरता:। गी. ५.२५) म्हणून आनंदाने अशा प्रकारे कर्माचरण करावे. अशी व्यक्तीच पापरहित होऊन आत्यंतिक कल्याण साधते.

**दु:ख पचविलेच पाहिजे :**

जीवन सुखदु:खांनी व्याप्त आहे. यातून कोणीही सुटू शकत नाही. प्रत्येकालाच दु:खाचे चटके बसतात. सर्व-सामान्यपणे माणूस दु:खाने निराश होतो, विवश होतो, जगाशी भांडतो, ईश्वराला शिव्या घालतो. जीवनात दु:ख आहे त्याचा स्वीकार कर असे गीता सांगते आणि ते दु:ख समर्थपणे पचविण्यासाठी शिकविते. या साठीच गीतेची सुरुवात अर्जुनाच्या उद्वेगातून झालेली आहे. जीवनातील साऱ्या कठीणतर प्रसंगांना अत्यंत धैर्याने तोंड द्यावयास हवे असेच श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात. ते म्हणतात - अरे पार्था तू आर्य जीवनाला अशोभनीय वर्तन करू नकोस. हा षंढपणा ठरेल (कैश्यं यास्म गम: पार्थ) हा दुबळा स्वभाव टाकून दे व धैर्याने उभा रहा (क्षुद्रं हृदय दौर्बलयं त्यक्त्या उत्तिष्ठ। गी. २/३)

**कर्तव्य पालन शाप नसून वरदान :**

जीवन म्हणजे कठोर परिश्रम, म्हणजेच कर्तव्य पालन होय. अनेकांना वाटते कर्तव्य पालन हा शाप आहे. गीता सांगते - परिश्रम करणे वा कर्तव्य पालन करणे हा मानवाचा हक्क आाहे. (कर्मणि व ते अधिकार:। गी. २.४७) आणि या कर्तव्याचे पालन संपूर्ण मनाने, आसक्ती विरहित केले पाहिजे. (असक्त: कुर्यात्। गी. ३.२५) स्वत:च्या हुषारीने व परिश्रमाने घडणाऱ्या कर्माचे फळ मानव सेवेत खर्ची घाल. (कर्मकल त्याग:। गी. १२/१२) अशा रीतीने कर्तव्य करणारा मानव या पृथ्वीतलावर फार वैभवाचे स्थान प्राप्त करून घेऊ शकतो. तसेच त्याचे आध्यात्मिक जीवनही उंचावते. हा मानवाचा विशेषाधिकार आहे. या अधिकाराप्रमाणे मानव वागत नसल्याने त्याला आनंद वाटत नाहीत तो दु:ख भोगतो. वास्तविक मूलत: कर्म वाईट वा चांगले संभवत नाही. कर्म टाळता येत नाही. कर्मावाचून जीवनही अशक्य होते. यातून मार्ग काढण्यास गीता मदत करते. कर्म अचूक म्हणजे कुशलतेने व नि:स्वार्थ भूमिकेतून

करावे. मानवाचे नित्याचे व्यवहार परस्परांवर अवलंबून असल्याने परस्परपूरक कर्म केल्यास जीवन सुसह्य होते. अशा विचारी मानवांच्या मेहनतीमुळेच जीवनाची फुलबाग फुलते. अन्यथा जीवनात पोकळीच निर्माण झाली असती. वैज्ञानिक स्वत:साठी शोध लावत नसतो. संपूर्ण मानवी जीवन सुखी करण्यासाठीच तो प्रयास करीत असतो.

**दुष्ट प्रवृत्तीचा नाश करणेच योग्य :**

मानवी जीवनात दुष्ट प्रवृत्ती भरपूर प्रमाणात आढळते. हा प्रत्येकाचाच अनुभव आहे. ही दुष्ट प्रवृत्ती केवळ इच्छा मात्रे करून नष्ट होत नसते. दृष्ट प्रवृत्ती ही मानव अपूर्ण असल्याचे द्योतक आहे. सर्व जगात सत् प्रवृत्ती प्रवृत्त झाल्यास जग निश्चितच पूर्णतेला पोहोचेल. हा एक विचारच आहे. कारण सर्वच माणसे पूर्णतेला, कधीकाळी पूर्णतेला पोहोचतील ही शक्यता नाही. जगात दुष्टता नांदत असते हे मान्यच करावे लागेल. म्हणूनच या दृष्टतेशी धैर्याने दोन हात करण्याची तयारी ठेविली पाहिजे. हे विविध उपायांनी करावे लागेल.

१) दृष्टतेला शरण जाणे

२) दृष्टतेचे परिवर्तन करण्याचा प्रयत्न करणे.

३) दृष्टतेला सुधारण्याचा उपाय योजणे

४) दुष्टतेचा पूर्ण नाश करणे.

आदी उपाय संभवतात. दुष्टतेशी सामना करावा का न करावा हा विवाद्य मुद्दा होऊ शकेल. अहिंसा हे एक उदार शस्त्र आहे. परंतु ते काही महात्म्यांच्या हाती शोभून दिसते. त्या शस्त्राचा वापर सामान्यांना करणे परवडत नाही. त्यासाठी विशिष्ट मानसिक घडण असावी लागते. शिवाय या शस्त्राच्या वापराने कदाचित आपलीच हिंसा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. दुष्ट प्रवृत्तीचा नायनाट करताना हिंसा घडते हे मान्य करतानाच, आपण अनेक निरपराध लोकांची हत्या अगर त्या दुष्ट प्रवृत्तीकडून होणारी हिंसा टाळू शकतो. म्हणजेच अहिंसेने दुष्ट प्रवृत्तीला पायबंद घालता येत नाही हेच सिद्ध होते. म्हणूनच श्रीकृष्ण सांगतात धैर्याने उभा रहा व दोन हात कर. ही शिकवण सर्व-सामान्यांसाठी आहे. (उतिष्ठ युद्धयस्व।) याच संदर्भात ते पुढे म्हणतात. ज्यावेळी अधर्म माजतो दुष्टता बळावते त्यावेळी मी स्वत: पृथ्वीवर अवतरतो. धर्माची स्थापना करतो सज्जनतेचे रक्षण करतो दुष्ट प्रवृत्तींचा नायनाट करतो. (परिमाणाय साधूनां विनाशायच दुष्कृतां। धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे। गी. ४/७.८) दुष्ट प्रवृत्तींकडे डोळेझाक करून चालणार नाही. मानवाने त्या प्रवृत्तींचा नायनाटच केला पाहिजे.

**मृत्यू अटळ आहे :**

जीवनात मृत्यू ही एक अतिशय दु:खद घटना आहे. ती वैश्विक स्वरूपाची आहे आणि ती अटळ आहे. मृत्यू म्हणजे नव जीवनच. ती जीवनातील एक नैसर्गिक घटना आहे. (जातस्य हि ध्रुवो मृत्यू:।) मृत्यू मुळेच जग हे नित्य नूतन व ताजे तवाने राहिले आहे. हा मृत्यू धैर्यानेच आपल्याला स्वीकारावा लागेल. विवेकाने परिपूर्ण माणसाला मृत्यू पासूनचे भय उरत नाही. हे एक रूपांतर आहे असे तो मानतो. जुने वस्त्र टाकून नवीन वस्त्र धारण करण्याइतपत हे सहज आहे असे त्याला वाटते. मृत्यूमुळे व्यक्तिमत्त्वाचा नाश होत नाही. उलट त्यामुळेच त्या व्यक्तिमत्त्वाला नवीन जीवनाचा उजाळा प्राप्त होतो. जीवाला नवीन जोम प्राप्त होतो. जीवनात उत्साह वाढतो. नवीन मित्र, नवीन संसार, नवीन संधी मिळते. जीवन उत्तुंग व उदात्त बनविण्यासाठी जीवाला पुन: संधी प्राप्त होते. म्हणून गीता सांगते मृत्यूला इतके घाबरून जाऊ नका, व शोकही करू नका. विवेकी माणूस याविषयी शोक करीत नाही. (पंडीता: न अनुशोचन्ति। गी. २-११ धीरा न मुहाति। गी. २/२३ जातस्य हि ध्रुवो मृत्यु: ध्रुवं जन्म मृतस्य च। अपरिहार्यर्थे नत्वं शोचितुं अहेसि। गी. २/२७ अटळ

गोष्टीसाठी विवेकी माणूस शोक करीत नाही.

**गीतेतील ईश्वर कल्पना :**

गीता सांगते ईश्वर दूर कुठे स्वर्गात राहात नसून तो सर्वत्र आहे. सगळ्या वस्तुमात्रात तोच असून त्याच्यातच सगळे विश्व सामावलेले आहे. तोच सगळ्या प्राणिमात्रात वास करतो. प्रत्येक अणुरेणूला त्याजपासून चैतन्य प्राप्त झाले आहे. संपूर्ण विश्व हे त्याचेच व्यक्त रूप आहे. विश्वातील प्रत्येक वस्ती ही त्याचीच छोटी वा मोठी प्रतिकृती आहे. किंबहुना प्रत्येक शद्ब, प्रत्येक विचार, प्रत्येक कृती हे ही तोच आहे. मानवाने या सगळ्या गोष्टींचा उपयोग करून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या सर्वांचे कल्याण साधण्याचा प्रयत्न करणे कमीत कमी एकातरी प्राणिमात्राचे हित होईल असे वागणे, हाच गीतेच्या दृष्टीने यज्ञ होय; हीच परमात्म्याची पूजा होय.

आपल्या संपूर्ण सामर्थ्यानिशी उत्कृष्टपणे कर्तव्य पालन करणे हेच गीतेला अभिप्रेत आहे. मग ते कर्तव्य जनसेवेच्या स्वरूपाचे असो, ज्ञानदानाने मानवी विचारांना विस्तारित रूप देणारे असो वा औद्योगिक क्षमता आणि कुशलता वृद्धिंगत करणारे असो, गीता स्पष्ट पणे सांगते की ईश्वरी पूजा म्हणजे कर्तव्यपालन होय. असे करणारी व्यक्ती कल्याणाप्रत जाते (स्वे स्वे कर्मणि अभिरत: संसिध्दिं लभते नर:।)

**सगळेच मार्ग परमेश्वराकडे जातात :**

सगळीच शास्त्रे मानवाला आवश्यक आहेत. कारण मानवी गरजांच्या पूर्ततेसाठी त्यांची उपयुक्तता आहे. ज्ञान ही कोणा व्यक्तीची मिरासदारी नाही. त्याला अनेक पैलू संभवतात. त्यामुळे ऐहिक वा पारमार्थिक जीवनात प्रत्येक व्यक्ती वेगळ्या स्तरावर प्रयत्न करताना आढळते. श्रीकृष्णाने कोणत्याही साधनेचा आग्रह धरलेला नाही. ते प्रत्येकाच्या आवडीवर सोपवून टाकले आहे. श्रीकृष्ण म्हणतात - सगळेच मार्ग परमात्म्याकडेच जातात (ममवर्त्म अनुवर्तन्ते मनुष्या: पार्थ सर्वश:। गी ४.११) ठोकळेबाजपणे समानता निर्माण करण्याचा आग्रह धरणे घातक असल्याचे गीता प्रतिपादन करते. विविधतेत एकता कशी साधता येते हेच गीतेने प्रतिपादले आहे. समाजात विविध वैचारिक स्तर असणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्येकालाच उच्च स्तरावर जाण्याची प्रेरणा मिळते. ईश्वर हा समानतेचा ठोकळा आहे असे गीता प्रतिपादन करीत नाही. (य: यां तनुं भक्त: श्रध्दया अर्चितुं इच्छति। तस्य अचलां श्रध्दां विद्धामि। (गी.७.२१)

**गीता जीवनगाथा :**

गीता हा धार्मिक ग्रंथ नसून समग्र जीवन व्यापणारा ग्रंथ आहे. आपले संपूर्ण जीवन दैवी करता येते आणि महामानवात रूपांतरित करता येते असे सांगणारा हा ग्रंथ आहे. प्रत्येक मानव कर्तव्यपालनाने देवाची पूजा बांधून कल्याण प्राप्त करू शकतो. प्रत्येक कर्म ही ईश्वरी पूजा झाली पाहिजे. प्रत्येक काम कुशलतेने उत्साहाने आणि लोकहितार्थ केले पाहिजे. स्वार्थ प्रेरित होऊन कर्म करणे हे अशुद्ध स्वरूपाचे आहे. केवळ स्वार्थरहित कर्मानेच आत्मशुद्धी होते. या आचरणाने स्वत: समवेत इतरांचेही कल्याण मानवाला साधता येते. यासाठी प्रयत्नशील रहावे असे गीता सांगते.

(क्रमश:)

**श्री. शं. बा. मठ**

६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

# ''वासांसि जीर्णानि यथा विशय ...''

*डिसेंबरची ९ तारीख (मार्गशीर्ष शु. एकादशी) हा गीता जयंतीचा दिवस. त्यानिमित्ताने गीतेतील श्लोकांचे हे निरूपण - संपादक*

एक दिवस आमच्याच सोसायटीतल्या एकाचा मला फोन आला, 'माझ्या आईच्या तेराव्याला तुम्ही आमच्या घरी येऊन गीतेवर बोलाल का? आमच्या घरी नातेवाईक मंडळी जमली आहेत. त्यांच्यासमोर तुम्ही गीतेवर काहीतरी अर्धा पाऊण तास बोला. हा प्रयोग मी प्रथमच करतो आहे. तुम्हाला यायला चालेल ना!' मी एकदम हो म्हटले. आमच्या सोसायटीतल्या नेहमीच्या ओळखीच्या एक वयोवृद्ध बाई गेल्या होत्या. त्यांच्या घरी मी भेटूनही आले होते.

बाराव्या दिवशीच सर्व सूतक संपते. तेरावा दिवशी गोडधोड करून, घरात गोमूत्र शिंपडून सगळ्यांनी पुन्हा शुभकार्याला वगैरे सुरुवात करायची असते. 'Show must go on' 'मरे एक त्याचा दुजा शोक वाहे। अकस्मात तोही पुढे जात आहे।' असे म्हटले आहे ना! त्यांनी चांगल्या हेतूने बोलावले. मी नि:संकोचपणे त्यांच्या घरी गेले. मी आसनावर बसले. माझ्या समोर बाल तरुण वृद्ध सारेच बसले होते. त्यांच्या आईच्या फोटोला व भगवंताला हात जोडून वंदन करून मी बोलायला सुरवात केली.

'वासांसि जीर्णनि यथा विहाय
नवनि गृण्हानि नरोपराणि।
तथा शरीराणि विशय जीर्णा-
न्यन्यानि संयाति नवानि देही॥ २.२२

ज्याप्रमाणे मनुष्य जुनी वस्त्रे टाकून नवी वस्त्रे परिधान करतो, त्याचप्रमाणे देही म्हणजे शरीराचा मालक आत्मा जुना झालेला देह टाकून नवा देह धारण करतो. म्हणून त्याबद्दल शोक नको.

मी हे बोलत होते, पण मलाच अश्रू आवरत नव्हते. कंठ दाटून आला होता त्यांच्या आईच्या आठवणीने. आज आई आपल्यात नाहीत हे खरेच वाटत नाही. त्या तुमच्यात बसल्याच आहेत असे वाटते. खरे तर त्यांनाच माझे गीतेवर प्रवचन ऐकायचे होते. माझे 'सांगे गीता' पुस्तक मी त्यांना दिले तेव्हा त्या म्हणाल्या होत्या, हे पुस्तक मी वाचेनच. पण जवळपास कुठे तुमचे प्रवचन असेल तर मला सांगा मी एखाद्या दिवशी तरी नक्की येईन. पण आज काय वेळ आली पहा. त्यांच्या तेराव्याला मी गीता प्रवचन करीत आहे. पण आज त्या देहाने आपल्यात नसल्या तरी आत्मा रूपाने त्या आपल्यातच आहेत.

बहुनि मे व्यतितानि जन्मानि तव चार्जुन।
तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप॥४.५॥

भगवंत गीतेतील चौथ्या अध्यायातील ५ व्या श्लोकात सांगतात अर्जुना, माझे आणि तुझे पुष्कळ जन्म होऊन गेलेत. ते सर्व मी जाणतो, तू जाणत नाहीस, (आपण पूर्वी होतो आज आहोत व उद्याही असणार आहोत.) पार्था नको तिथे मोह व नको त्याचा शोक हे दोन्हीही गैरच. आत्मा अविनाशी-नित्य-शाश्वत आहे. मरते ते शरीर आत्मा अमर आहे. आणि एक लक्षात ठेव मी म्हणजे हा देह नव्हे तर मी म्हणजे आत्मा आहे, मग मृत्यूचा शोक कशाला! आत्मा अव्यय, अव्यक्त आहे. तो भावरूप आहे म्हणून त्याचा अभाव नाही.

नैनं छिन्दति शस्त्राणि नैवं दहति पावक:।
न चैनं क्लेदयंन्त्यापो न शोषयति मारुत:॥ २.२३

अच्छेद्योऽयमदासोऽयम क्लेद्योऽशोष्य एवच।
नित्य सर्वगत: स्थाणुरचलीऽयं सनातन:॥२.२४

आत्म्याला शस्त्रे तोडीत नाहीत. अग्नि जाळू शकत नाही. तसेच त्याला पाणीही भिजवू शकत नाही अगर वारा सुकवू शकत नाही. कधीही तोडता न येणारा, न जळला जाणारा, न भिजणारा, न सुकणारा असा हा आत्मा नित्य सर्वव्यापी स्थिर, अचल, सनातन, आहे. हे आत्म्याचे स्वरूप ओळखून तू त्याच्याबद्दल शोक करणे उचित नाही.

इथे हे लक्षात ठेवा, भगवंतांनी गीतारूपी अमृत अर्जुनाच्या निमित्ताने सर्व जगाला दिले आहे. विनोबाजी गीतेला जीवनाचे आचरण शास्त्र म्हणतात. मोक्ष प्राप्तीसाठी माणसाने प्रपंच व परमार्थ यांची कशी सांगड घालावी हे भगवंताने गीतेत सांगितले आहे.

गीता ही देव्हाऱ्यात ठेऊन गंध, अक्षता, फुले वाहण्यासाठी किंवा स्तोत्र म्हणून (न समजता) पुटपुटण्यासाठी नाही. तसेच ती म्हातारपणीच वाचण्यासाठी आहे, असे तर मुळीच नाही. तुम्ही लहान वयात ती समजून पाठ केलीत तर जीवन कसे जगावे तेही मोक्षपथावर मार्गक्रमण कसे करावे हे गीता शिकवते. मग म्हातारपणी बैल गेला नि झोपा केल्याप्रमाणे ती वाचून काय उपयोग!

आज लहान मुले व तरुण मुलं माझ्यासमोर बसलेली पाहून मला खूप समाधान वाटत आहे.

गीतेने आपल्याला तीन सिद्धान्त सांगितले आहेत. १) देहाचं क्षणभंगुरत्व २) आत्म्याचं अमरत्व ३) सृष्टीचं परिवर्तन. देह नाशिवंत, क्षणभंगुर, अनित्य, मर्त्य आहे. आत्मा नित्य, शाश्वत, अमर आहे. म्हणून,

अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे।
गतासूनगतासूंश्च नानुशोचन्ति पण्डिता:॥ २.११

अर्जुना, ज्यांचा शोक करू नये त्यांचा तू शोक करीत आहेस आणि वर मलाच पांडित्याच्या पोकळ गोष्टी सांगतोस! अरे जे खरे पंडित आहेत ते मेलेल्यांचा किंवा जित्यांचा शोक करीत नसतात.

नत्वेवाहं जातु नासं न त्वं नेमे जनाधि पा:।
न चैव न भवैस्याम: सर्वे वयमत: परम॥ २.१२

अरे मी तू व हे सर्व राजे पूर्वी केव्हाही नव्हते असे नाही. तसेच आम्ही सर्वजण ह्यापुढे असणार नाही असेही नाही.

देहि नोऽस्मिन यथा देहे कौमारं यौवनं जरा।
तथा देहान्तर प्रोपिर्धीरस्तत्र न मुझति॥ २.१३

ज्याप्रमाणे जन्म, बालपण, तारुण्य, म्हातारपण ह्या देहाच्या अवस्था आहेत. त्याचप्रमाणे (मृत्यूनंतर) जीवात्म्याला एकामागून एक देह प्राप्त होत असतात. म्हणून विचारी मनुष्य त्याबद्दल मोह करत नाहीत.

य एनं वेत्ति हन्तारं यश्चैनं मन्यते हतम्।
लभो तौ न विजानीतो नायं हन्ति न इन्यतै॥२.१९

जो कोणी याला मारणारा असे मानतो आणि जो याला मेला असे समजतो त्या दोघांनाही खरे (तत्त्व) समजलेच नाही. कारण आत्मा कोणाला मारतही नाही व कोणाकडून मारलाही जात नाही.

न जायते म्रियते वा कदाचि -
न्नायं भूत्वा भविता वा न भूव:।
अजो नित्य: शाश्वतोऽयं पुराणो
न इन्यते दृन्यमाने शरीरे॥ २.२०

हा आत्मा जन्मतही नाही किंवा मरतही नाही. हा जन्मला होता नि पुन्हा नाहीसा झाला असे कधीही होत नाही. हा जन्मरहित, नित्य, शाश्वत असा पुराणपुरुष आहे. नाश देहाचा झाला, तरी आत्म्याचा नाश होत नाही. म्हणून आपण मी म्हणजे देह नाही मी आत्मा आहे हे जाणून देह केंद्री न होता आत्मकेंद्री झाले पाहिजे. पण तरीही तुला वाटत असेल,

अथ चैनं नित्यजातं नित्यं वा मन्यसे मृतम्।
तथापि त्वं महाबाही नैनं शोचितुमहीसे॥ २.२६

हा आत्मा नेहमी जन्म घेतो व नेहमी मृत्यू पावतो तरी तुला त्याबद्दल शोक करणे योग्य नाही. कारण -

जातस्य हि ध्रुवो मृत्यू र्ध्रवं जन्म मृतस्यच।
तस्माद परिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि॥ २.२७
अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत।
अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवता॥ २.२८

जो जन्माला आला त्याला मृत्यू व ज्याला मृत्यू आला त्याला जन्मप्राप्ती निश्चित आहे. म्हणून ह्या अटळ गोष्टीविषयी (तुझ्या वरील मताप्रमाणे) शोक करणे उचित नाही. ही भूते (जीवात्मे) जन्माच्या पूर्वी अव्यक्त स्थितीत असतात आणि शेवटी मेल्यानंतर अव्यक्तातच लय पावतात. त्यांची मधली स्थिती (जन्म) मात्र दृश्य आहे. त्याबद्दल शोक कशाला?

कुरुक्षेत्रावर समोर आप्तस्वकीय म्हणजे काका, मामा, पुतणे, भाचे, गुरु, बंधू वगैरेनां पाहून ह्यांना मी कसा मारू? म्हणून मोह पावून शोक करणाऱ्या अर्जुनाला श्रीकृष्णांनी हा उपदेश केला आहे. आपल्यालाही तो किती लागू आहे. आपले जीवन म्हणेजही एक युद्ध, लढाईच आहे. त्याला सामोरं कसं जायचं पैलतीर कसं गाठायचं हे भगवंतानी गीतेच्या माध्यमातून सुस्पष्ट केल आहे.

अर्जुनाला पहिल्या अध्यायात मोह उत्पन्न झाला म्हणून दुसऱ्या अध्यायात भगवंतांनी देह बुद्धीच्या संकीर्णतेतून अर्जुनाला बाहेर येऊन (आत्मनिष्ठ होण्याचा) व्यापक दृष्टीकोन ठेवण्याचा सल्ला दिला आहे.

विनोबाजी मृत्यूचं भय किंवा दुःख कमी करण्यासाठी एक छान उदाहरण देतात. आपण देवपुजेसाठी ताजे पाणी, ताजे गंध, ताजी फुले, पत्री घेतो, ताजा नैवेद्यही ठेवतो मग पूजा करणारा देह तरी शिळा, जुना, जीर्ण कशाला? तो ही नवा का नको? म्हणजे मृत्यूनंतर पुन्हा नवा जन्म येऊन सर्व नव्या साहित्यासह देवांची पूजा करा.

काही जण 'मृत्यू' शब्द उच्चारायला, ऐकायलाही घाबरतात. त्यांना ते सांगतात मृत्यूला घाबरू नका त्याचे नित्य स्मरण ठेवा. मृत्यूची टांगती तलवार डोक्यावर आहे ही जाणीव नित्य असू द्या म्हणजे तुमचे आचरण चांगलेच राहील. तुमच्या हातून वाईट कृत्य होणारच नाही.

या संदर्भात एकनाथांची एक गोष्ट सांगते. एकदा एक माणूस एकनाथ महाराजांकडे आला होता. तो म्हणाला तुमचे आचरण वागणूक एवढी चांगली कशी? आम्हांला का असे वागता येत नाही? एकनाथ महाराज हसले. थोड्यावेळाने त्या माणसाच्या चेहऱ्याकडे पाहून म्हणाले, तुम्हांला वाईट वाटेल पण तरी सांगतो की तुम्हांला फारच थोडे आयुष्य बाकी उरले आहे. माणूस घाबरला. घरी आला ज्याला त्याला हेच सांगू लागला. माझे फार थोडे दिवस उरलेत. म्हणून चांगली कामे करू लागला. सर्वांशी चांगले प्रेमाने वागू लागला. सर्वांना शिव्या हासडणारा एकदम बदलल्याचे पाहून लोक आश्चर्य करू लागले. घरची मंडळी ही हबकून गेली, तो एकदम नम्र, दयाळू, प्रेमळ, परोपकारी बनला. कधीही मरण येईल याची वाट पहात, पुण्य गाठी जोडू लागला. बराच काळ उलटून गेला मरण आले नाही. मग तो माणूस एकनाथांकडे जाऊन विचारू लागला. अजून मला मरण कसे आले नाही. तुम्ही तर म्हणाला होता. मी बरोबर म्हणालो होतो ते, तुम्हाला आमच्यासारखे व्हायचे होते ना! म्हणून मी तुम्हाला तसे सांगितले. तुम्ही संत कोटीचे आहात ही वार्ता कानी आली. असे आम्ही पण कायम मृत्यूची टांगती तलवार डोक्यावर आहे हे धरून चालतो नि त्याप्रमाणे वागतो. मग दुराचरण होतच नाही म्हणून मृत्यूचे स्मरण नेहमी ठेवावे. 'म्हणूनि मर्यादा लाविली देवे। नीती न्याये वर्तावे। नाहीतर लागतील भोगावे। यमयातना॥ रामदास स्वामींनी पण दासबोधात हेच सांगितले आहे.

सुखदुःखे ही इंद्रियजन्य आहेत. ती देहाची आहेत. ती देहाबरोबरच संपतात. म्हणून तू जन्म मृत्यू मानतच असशील तर ते तू सहन कर. त्याचे दुःख नको.

देही नित्यमवध्योऽयं देहे सर्वस्य भारत।
तस्मात् सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि॥२.३०

सर्वांच्या देहातला आत्मा हा कधी ही मारता येण्याजोगा नाही. म्हणून कोणाही प्राण्याबद्दल तू शोक करूं नकोस. ज्यापासून हे जग बनले आहे ते आत्मतत्त्व अविनाशी आहे. नित्य - शाश्वत - अव्यक्त आहे. आम्ही त्याला देहबुद्धीच्या कोंडीत बंदिस्त करून ठेवतो. नि निरनिराळी डबकी निर्माण करतो. मी, माझे व माझे आम्हा संबंधी एवढीच माझी संकुचित व्याप्ती. गीतेच्या सुरुवातीलाच धृतराष्ट्र संजयाला विचारतो, ‘‘मामका: पाण्डवाश्चैव किमकुर्वत संजय॥ १.१

कुरुक्षेत्रावर युद्धासाठी जमलेल्या माझ्या पुत्रांनी व पांडवांनी काय केले. धृतराष्ट्र चर्मचक्षूंनी तर आंधळा होताच पण अंत:चक्षूंनी तो पुत्र प्रेमाने आंधळा झाला होता. स्वधर्माच्या मार्गात काटे पसरविणाऱ्या मोहाची बाह्यरूपे असंख्य आहेत. या सर्वांच्या मुळाशी संकुचित आणि उथळ देहबुद्धी आहे. भगवंत गीतेत सांगतात या देहबुद्धीच्या डबक्यातून बाहेर ये. व्यापक, विशाल दृष्टिकोन ठेव. सारखं मी, मी, माझं, माझं कशाला? केवळ व्यक्तिगत स्वार्थी विचार न करता दुसऱ्यांचा, समाजाचा समष्टीचा, राष्ट्राचा, जगाचा, मानवाचा विचार कर.

लुकलुकता तो तारा, झुळझुळता हा वारा
अम्हा सांगती चला उठा रे मनी हाच निर्धार करा।
दुसऱ्यांना सुखविण्यात आहे जीवनात आनंद खरा॥

आणि म्हणूनच तुका आकाशाएवढा होतो. रामदास स्वामी लहानपणीच आईला म्हणतात ‘चिंता करितो विश्वाची.’

आत्म्याला मुक्तानंद हवा आहे पण आम्ही त्याला देहानंदी रंगविले आहे. ‘हे विश्वचि माझे घर’ म्हणून त्याला विश्वाला मिठीत घ्यायचे आहे.

आत्मा हा अखंड वाहणारा झरा आहे. त्यावर अनेक देह येतात नि जातात. मग देहसंबंधी तेवढेच माझे काय म्हणतोस? या देहाच्या मृत्यूबद्दल शोक का करतोस? जर एकच एक देह कायमचा आत्म्याला चिकटून राहिला असता तर आत्म्याची धडगत नव्हती. मग सारा विकासच थांबला असता. आनंद लोपला असता. म्हणून देहाचा नाश ही शोचनीय गोष्ट नाही. एका अर्थाने मृत्यू हा प्राणिमात्रांना शाप नव्हे तर वरदान आहे.

आपल्या शरीरातल्या सर्व पेशी दर सात दिवसांनी संपूर्ण बदलत असतात. सर्व सृष्टीत परिवर्तन होते म्हणून दिवस रात्र, ऋतू चक्र फिरत असते. इथे कुठलीच गोष्ट नाहीशी होत नाही. त्याचे परिवर्तन होते. जसे डोंगर, मोठाले दगड, लहान गोटे, गिट्टी, वाळू. तसेच जन्म, बाल्य, तारुण्य, वृद्धत्व, मृत्यू. मृत्यूनंतर पुन्हा जन्म. लहानपणी आपल्याला पाहिलेली व्यक्ती मोठेपणी भेटली तर म्हणते ‘अरे किती बदललास तू, ओळखलंच नाही!’ बाल्य संपून तारुण्य आलं तर ते आपण स्वीकारतो. बाल्य हरवलं म्हणून रडत बसत नाही. कारण परिवर्तन हा सृष्टीचा नियम आहे.

तुला जर आत्मज्ञानी व्हायचे असेल ही जन्म मृत्यूची येरझार टाळायची असेल, तर नित्य सत्वगुणात स्थिर बुद्धीने राहिलास तर तू आत्मज्ञानी होशील, कर्मयोगी होशील. स्वधर्म कर्म कर्तव्यबुद्धीने, समत्व राखून केलेस तर हे सर्व साध्य होईल. म्हणून स्थिरबुद्धीने वाग. कर्मयोगी हो, हा गीतेचा संदेश आहे. गीता फक्त परमार्थच सांगत नाही तर प्रपंच नि परमार्थाची सांगड कशी घालायची ते सांगते. गीता जीवनोषनिषद आहे.

आता सत्वगुण म्हणजे काय? स्थिरबुद्धी म्हणजे काय? स्वधर्म कर्म, निष्काम कर्म, कर्मयोगी, आत्मज्ञानी, समत्वबुद्धी म्हणजे काय? असे अनेक प्रश्न तुम्हाला पडले असतील. आणि ते साहजिक आहे. पण म्हणून हे सर्व शंका निरसन होण्यासाठी प्रत्येकाने संपूर्ण गीताच समजून घ्यायला हवी. अभ्यासायला हवी. आज मी दुसऱ्या

(पृ.क्र. १३ पाहा)

# ऊरूम्चीः वाळवंटातील नंदनवन

*चीनमधील ऊरूम्ची शहरात वाळवंटातही नंदनवन फुलले आहे. इच्छाशक्ती असेल तर काय होते त्याचे हे उदाहरण - संपादक*


चीनमध्ये दरवर्षी किशोरांसाठी नवनिर्मिती स्पर्धा आयोजित करण्यात येते. २००८ ची ही स्पर्धा ऊरूम्ची या गावी जुलै महिन्यात आयोजित करण्यात आली होती. चीनच्या उत्तर पश्चिम भागात वसलेले हे शहर. जवळच कझाकिस्तान आणि मंगोलिया यांच्या सीमा आहेत. ऊरूम्ची हे नाव मंगोलीयन भाषेवरून आलेले आहे. त्याचा अर्थ कुरण असा आहे. मंगोलियातील मेंढपाळ आपल्या मेंढ्या येथे चारायला आणत असत. म्हणून त्यांनी असे नाव दिलेले असावे. तसे पाहता ऊरूम्ची शहर गोबी नावाच्या वाळवंटात वसलेले आहे. सर्वच रेताळ जमीन. तरीही या स्थळाला कुरण म्हणून का संबोधले असावे असा प्रश्न पडतो. या प्रश्नाचे उत्तर शहरात प्रवेश करताक्षणीच मिळते.



**मुंबई ते ऊरूम्ची प्रवासाची दिशा दाखवणारा नकाशा**

चीनमध्ये गोन्चाऊ (Goungzhon) शहरातून आम्ही प्रवासाला सुरुवात केली. कर्मधर्मसंयोगाने खिडकीजवळची जागा मिळाल्याने बाहेरचे दृश्य स्पष्ट दिसत होते. विमानाने गोन्चाऊ विमानतळावरून आकाशात झेप घेतली तेव्हा आजूबाजूला सर्वत्र हिरवळ दिसत होती. लहान लहान डोंगर, त्यावर तरंगणारे ढग असे ते मनोहारी दृश्य होते. संपूर्ण डोंगर झाडांनी झाकलेले होते. गोन्चाऊ ते ऊरूम्ची हा साडेपाच तासाचा विमानप्रवास आहे. साधारणपणे तास-दीडतास खालची हिरवळ दिसते. नंतर मात्र बोडके डोंगर दिसू लागतात. विमान जसजसे पुढे जाते तसतसे रेतीचे साम्राज्य दिसू लागते. जमीन रेताळ, डोंगरही रेतीचे असेच दृश्य दिसते. ढगाचा मागमूस नाही. कुठेतरी दूर लहानसे ढग दिसले तर भाग्यच म्हणायचे. विमान साधारणपणे ११ किलोमीटर उंचीवरून उडत असते. तेवढ्या उंचीवरून देखील खालचे दृश्य स्पष्ट दिसते. म्हणूनच एखादी लहानशी लोकवस्तीसुद्धा स्पष्ट दिसते. घराच्या छपरावरून परावर्तित होणाऱ्या प्रकाशामुळे घरे चकाकताना दिसतात. हे चित्र ऊरूम्चीच्या विमानतळावर उतरेपर्यंत कायम राहते. आपण वाळवंटात उतरत आहोत याची कल्पना आधीच आलेली असते. या वाळवंटात आपण एक आठवडा कसे राहणार आहोत याबद्दल मनात धाकधुक वाटत राहते.

ऊरूम्चीच्या विमानतळावर उतरण्यासाठी विमान जसजसे खाली येऊ लागते तसतसे आजूबाजूचे दृश्य बदलत जाते. विमानतळावरच्या चहोबाजूला वाढविलेल्या जंगलात आपण उतरत आहोत असा भास होतो. विमान उतरून जेव्हा आपल्या इच्छित स्थळी जाऊन उभे राहते तेव्हा आजूबाजूला पाहिले की आपल्याला झालेला तो भास नसून प्रत्यक्ष वस्तुस्थिती असल्याचे जाणवते. संपूर्ण विमानतळ मोठमोठ्या वृक्षांनी वेढलेले आहे. आवश्यक ते सोपस्कार आटोपून आपण जेव्हा विमानतळाच्या बाहेर



**ऊरूम्चीचे चीन देशातील स्थान दर्शविणारा नकाशा**

येतो तेव्हा संपूर्ण शहरच हिरवेगार असल्याचे जाणवते. रस्त्याच्या मधोमध आणि रस्त्याच्या दुतर्फा मोठमोठी झाडे वाढविली आहेत. त्यातच मधेमधे रंगीबेरंगी फुलांचे ताटवे डोकावतात. त्यामुळे विमानतळ ते हॉटेल हा प्रवास नेत्रसुखद असाच होतो. चौकांचे सुशोभीकरण तर फारच कलात्मक पद्धतीने केलेले आढळते. चौकांच्या मध्यभागी विशिष्ट आकाराची वस्तू आणि त्याच्या सभोवती रंगीबेरंगी फुलझाडे असे चौकांचे स्वरूप असते. आपल्याला चौकाचौकात पुतळे उभारण्याचा भारी सोस. ऊरूम्चीमध्ये मात्र पुतळ्यांचे दुर्भिक्षच आढळते. एखाद्या ठिकाणी पुतळा असला तर असला. नाहीतर लोखंडी किंवा सिमेंटचे बनविलेल्या वेगवेगळ्या आकृत्या ह्याच चौकाला शोभा आणताना दिसतात.






**गोबी वाळवंटाचे आकाशातून दिसणारे दर्शन**

वाळवंटात वसलेल्या या शहरात एवढी झाडे वाढविली कशी? हा प्रश्न सहजच मनात येतो. या प्रश्नाचे उत्तर तियान्ची तलावाला जाताना मिळाले. तियान्ची तलाव हा डोंगरांनी वेढल्यामुळे तयार झालेला नैसर्गिक तलाव आहे. ऊरूम्ची शहरापासून सुमारे ३०-३५ किलोमीटर अंतरावर असेल . त्या तलावाकडे आपण जातो तेव्हा रस्त्याच्या दोन्ही बाजूला झाडे लावल्याचे आपल्याला दिसते. या वाळवंटात पाऊस कितीसा पडणार आणि पावसाशिवाय ही लावलेली झाडे जगतील कशी? यावर चीनी लोकांनी उत्तम शक्कल लढविली आहे. तियान्ची तलावातून पाणी घेऊन ते ठिबक सिंचन पद्धतीने झाडांना पुरविले आहे. तियान्ची तलाव डोंगरामध्ये असल्याने अर्थातच उंचावर आहे. तेथून आणलेले पाणी गुरुत्वाकर्षणाने आपेआपच सखल भागाकडे येते. हे पाणी बारीक बारीक पाईपांच्या मदतीने झाडांपर्यंत नेलेले आहे. प्रत्येक झाडाच्या जवळ पाईपाला एक छोटे छिद्र पाडले आहे. त्यामुळे पाईपातील थेंब थेंब पाणी झाडांच्या मुळांना पुरविले जाते. त्यामुळे पाण्याचा अपव्य टाळता येतो आणि थोडेसेच पाणी अनेक झाडांना पुरविता येते. असेच काहीसे प्रयत्न शहरातील झाडे वाढविण्यासाठी केलेले असावेत. झाडे लहान असताना त्यांची देखभाल करावी लागते. ती मोठी झाली आणि त्यांची मुळे जमिनीत खोलवर गेली की त्यांची फारशी काळजी करावी लागत नाही.

प्रेमात पडण्यासाठी एखादा क्षणही पुरतो, पण ते विसरण्यात पूर्ण आयुष्य जाते.



ऊरूम्ची शहरातील लोकांना वनस्पतीचे आकर्षण असावे असे वाटते. जमिनीत लावलेल्या झाडांबरोबरच कुंड्यामध्ये लावलेली अनेक झाडे पाहायला मिळतात. त्यात अर्थातच फुलझाडांचा समावेश मोठ्या प्रमाणावर असतो. छोटेखानी झाड पण त्याला आलेली मोठमोठी आकर्षक फुले असे दृश्य सर्वत्र पाहायला मिळते. लोकांनी घरोघरी कुंड्यांमध्ये झाडे लावलेली आहेत. त्यामुळे एकूणच परिसर आल्हाददायक वाटतो. वाळवंटात वसलेले हे शहर म्हणूनच नंदनवनासाखे भासते. या शहराच्या तुलनेत आपल्याकडची परिस्थिती कितीतरी चांगली आहे. वर्षातील चार महिने येथे पाऊस पडतो. जमीन सुपीक आहे. तरी झाडे वाढविण्याचा आपण फारसा विचार केलेला नाही. काही निवडक शहरांमध्ये असा प्रयत्न झाला आहे. नाही असे नाही. परंतु अनेक गावे, वाड्या अजूनही बकाल अवस्थेत आहेत. रस्त्याने प्रवास करीत असताना शेतात पिके नसतील तर दोन्ही बाजूला रूक्षपणा जाणवतो. वनस्पतीची वाढ करून निसर्गाचा समतोल राखणे आपल्याला सहज शक्य आहे. त्यादृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे.

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण
जि. ठाणे- ४२१२०४

(पृ. क्र. १० वरून)

**''वासांसि जीर्णानि यथा विशय ...''**

अध्यायातील आत्म्याचे अमरत्व, देहाचे क्षणभंगुरत्व, मृत्यू म्हणजे देहांतर देहाचे जुने वस्त्र बदलणे व नवे धारण करणे हा थोडासा भाग घेतला. आज इतकेच पुरे.

आज तुम्ही लहान थोर सर्वच गीता ऐकण्यात रंगून गेलात. माझ्या सांगण्याचे सार्थक झाले. आपण सामान्य माणसं मृत्यूचा शोक करतो. गीतेचे तत्त्वज्ञान जाणून घ्यायला सुरुवात तर केली आहे. आत्मज्ञानी होणे सोपे नाही. त्यासाठी एक जन्म पुरणार नाही. पण त्यामुळे मृत्यूचे भय - दु:ख निश्चित कमी होईल. भगवंत म्हणतात, हे असाध्य आहे पण अशक्य नाही.

असाध्य ते साध्य। करिता सायास।
कारण अभ्यास। तुका म्हणे॥

तुकाराम महाराज

• • •

केल्याने होत आहे रे। आधी केलेचि पाहिजे॥

रामदासस्वामी

त्यांच्या घरचे सारे श्रोते भान हरपून, एकाग्रतेने ऐकत होते. काही काळ तरी सद्य परिस्थितीचा सर्वांना विसर पडला होता. आतापासून पुन्हा रोजचे जीवन जगायला चालू करायचे होते. अशी प्रथा सर्वांनी पाडायला काय हरकत आहे? ज्ञानग्रहण, सद्‌विचार कानावर पडणे हे केव्हाही, कोठेही, कधीही चांगलेच नाही का?

**आशा भिडे**
बी/९ विजय अर्पाटमेंटस्, आराधना
टॉकीजजवळ, ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी - २५४१०१४०
मोबाईल - ९३२४०४४७६४

•••

# शुद्ध भाव

*शुद्ध भावनेचे आयुष्यात असाधारण महत्त्व असते, त्याबद्दलच हे काही विचार - संपादक*

शुद्ध भाव व अशुद्ध भाव असे दोन प्रकारचे भाव माणसामध्ये दिसून येतात. ज्या प्रकारच्या भावनेतून आपण कार्य करीत असतो त्यातूनच आपले कर्म बनत जाते. जर एखाद्या गोष्टीबद्दल / वस्तूबद्दल आपल्या मनात आपण जास्त मोह बाळगला तर अशा वेळी तो भाव अशुद्ध भाव समजल जातो. म्हणून माणसाजवळ मोह नसावा. मोह नसेल तरच मनातील भाव शुद्ध रहातो, चांगला रहातो.

मोहाचेही आपणास मुख्य दोन प्रकार दिसून येतात. १) दर्शन मोह २) चरित्र मोह

जे पदार्थ किंवा ज्या वस्तू प्रत्यक्ष डोळ्यांनी पहाता येतात किंवा दिसतात त्यातून मनामध्ये जो मोह निर्माण होतो तो दर्शन मोह होय. हिरे, मोती, धन, पैसा इ. वस्तू डोळ्यांना दिसल्या की, कळत - नकळत मनात मोह निर्माण होत असतो. तर चरित्र मोहामध्ये कामवासना, हवा हवासा वाटणारा स्पर्श अशा प्रकारच्या मोहांचा समावेश होतो.

माणसाच्या मनात अनेक प्रकारचे भाव असतात. हे भाव त्याच्यावर झालेल्या संस्कारातून निर्माण होतात. म्हणून तर प्रत्येक व्यक्तीमध्ये वेगवेगळे भाव असल्याचे दिसून येतात. एखादी सुंदर स्त्री रस्त्यावर उभी पाहिल्यास काही व्यक्ती त्या स्त्रीकडे आई, बहीण, मावशी अशा वेगवेगळ्या भावनेने पहातील तर काही व्यक्ती पत्नी,उपभोग्य वस्तू या भावनेतून पहातील. हे केवळ माणसांच्या मनातील भावांमुळेच. खुनी व्यक्तीने खून करण्याच्या उद्देशाने हातात घेतलेल सुरा आणि डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करण्याच्या उद्देशाने हाती घेतलेला सुरा या दोघांचे भाव वेगवेगळे असतात किंवा वडील आपल्या मुलीला मिठीत घेतात तो भाव आणि एक तरुण एका तरुणीला मिठीत घेतो तो भाव, यात भिन्नता दिसून येते.

माणसाच्या मनात शुद्ध भाव असायला हवा. त्यांनी शुद्ध भावनेतूनच कार्य करावे. कोणतेही कार्य करताना मानवाच्या कल्याणाचाच विचार करावा. चुकीच्या मार्गाने एकही कार्य करू नये. जर एखादे वेळेस आपण चुकीचे कार्य केले तर तो दिवस आपला व्यर्थ गेला असे समजावे. आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण महत्त्वाचा असतो. त्या क्षणाचा उपयोग चांगले कार्य करण्यासाठीच करा. जर आपण आपला एक दिवस फुकट / व्यर्थ घालवला तर तो दिवस पुन्हा कोव्हाही येणार नाही. म्हणून येणाऱ्या प्रत्येक क्षणाचा सदुपयोग करून घेतला पाहिजे.

वरवर गोड बोलणाऱ्या, इतरांबद्दल खूप प्रेम /दया आहे असे दाखवणाऱ्या अनेक व्यक्ती आपणास दिसतात. पण आतून त्यांच्या मनात कपट भाव असतो. अशा कपट भावनेतून केलेले कार्यही व्यर्थच असते. म्हणून माणसांच्या मनातील शुद्ध भाव हीच खरी माणसांची संस्कृती होय. माणसांच्या जीवनाचा प्रवास हा विकृतीकडून संस्कृतीकडे जाणारा असावा. दुसऱ्याच्या हातातील भाकरी हिसकावून घेणे म्हणजे विकृती होय, आपण कष्ट करून, शुद्ध भावनेतून भाकरी कमावणे ही प्रवृती होय आणि कष्टाने कमवलेल्या भाकरीतून आर्धी भाकर गरजू व्यक्तीला देणे हीच माणसांची खरी संस्कृती होय.

**श्री. यशवंत माने**
ग्रंथालय विभाग,
रुपारेल महाविद्यालय,
मुंबई - ४०००२६

●●●

कर्तबगारी ही सिद्ध करायची गोष्ट असते, सांगत बसण्याची नाही.

साहित्य जगत

# त्रैभाषिक महाकोश शब्दानंद

सौ. सत्वशीला वि. सामंत (१६ यशोकुंज सोसायटी, तेजसनगर, पुणे - ४११०३८) या विदुषीचा त्रैभाषिक (इंग्रजी-हिंदी-मराठी) व व्यवहारोपयोगी विषयावर शब्दकोशाची पहिली आवृत्ती मार्च २००७ मध्ये प्रसिद्ध झाली. एकदीड वर्षातच या अत्यंत उपयोगी महाकोशाची पहिली आवृत्ती संपली. आता नुकतीच त्याची सुधारित दुसरी आवृत्ती (पृ. ८७६, मूल्य रु. १८००/-) प्रसिद्ध झालेली आहे. दत्तात्रेय गं. पाष्टे (डायमंड पब्लिकेशन्स, शंकर प्रसाद को. ऑप. हौ. सो. १६९१, सदाशिव पेठ, ग्राहक पेठ जवळ, पुणे - ४११०३०) हे त्याचे प्रकाशक आहेत.

**ठळक वैशिष्ट्ये :**

- ७० विषयशीर्षकांतर्गत २७,००० इंग्रजी संज्ञा आणि हिंदी व मराठी भाषांतील प्रत्येकी ३०,००० हून अधिक प्रतिशब्द देणारा हा ८७६ पृष्ठांचा महाकोश (मानव्यविद्या, विज्ञान व वाणिज्य) या सर्व विद्याशाखांना उपयोगी आहे.
- लेखक, संशोधक, वृत्तकार-पत्रकार, अध्यापक-प्राध्यापक, विद्यार्थी अनुवादक, अभ्यासक आणि जिज्ञासू भाषा प्रेमी या सर्वांचा तो विश्‍वासू साथीदार आहे.
- प्रादेशिक भाषा मराठी, राष्ट्रभाषा हिंदी आणि आंतरराष्ट्रीय भाषा या तिन्हींमधील पारस्परिक भाषांतर व्यवहारासाठी उपयुक्त त्रैभाषिक शब्दकोश.
- विपुल व्यावहारिक व पारिभाषिक शब्द संज्ञांनी बहरलेला कोशांगणातील हा शब्दकल्पतरू आहे.

**कोशरचनाकार सौ. सत्वशीला सामंत यांचा अल्पपरिचय :**

सौ. सत्वशीला सामंत यांचा जन्म २५ मार्च १९४५ चा. शिक्षण बी.ए. (संस्कृत मराठी) एल.एल.बी. डिप्लोमा इन लिंग्विस्टिक्स (मुंबई विद्यापीठ) १९६६ पासून महाराष्ट्र सरकारच्या भाषा संचालनालय खात्यात प्रथमत: 'अनुवादक' म्हणून व नंतर सहाय्यक संचालक म्हणून २० वर्षे सेवा. १९८६ साली 'भाषा उपसंचालक' पदावरून स्वेच्छानिवृत्ती. 'ज्ञानकोश'कार श्रीधर व्यंकटेश केतकर, यांच्या त्या कन्या. कै. वीय शर्मा यांच्या मूळ इंग्रजी कथांचा अनुवाद संग्रह, 'आहेर' १९९७ साली 'ग्रंथाली'ने प्रकाशित केला. सध्या भाषाविषयक बौद्धिक उपक्रमांत मग्न. 'मराठी शुद्धलेखन' या जिव्हाळ्याच्या विषयावर अधून-मधून 'रुची', 'भाषा आणि जीवन' इ. नियतकालिकांतून व मराठी वृत्तपत्रांतून स्फुट लिखाण. १९९९ साली 'व्याकरण शुद्ध लेखनप्रणाली' हे पुस्तक गोकुळ मासिक प्रकाशन (पुणे) द्वारे प्रकाशित.

**सौ. सामंत यांचे मनोगत :**

आपल्या 'मनोगता'त त्या म्हणतात, '' योगायोगाने एका वृद्ध गृहस्थांनी हौसेखातर विद्यार्थ्यांसाठी तयार केलेला एक छोटासा विषयवार शब्दकोश तपासणीसाठी हाती आला. तो मी तपासून दिला पण त्या कोशाची मध्यवर्ती कल्पना माझ्या डोक्यात ठाण मांडून बसली व मी त्या दिशेने शब्दांची जमवाजमव करावयावस सुरुवात केली व एक त्रैभाषिक (इंग्रजी-हिंदी-मराठी) विषयवार (Classified) शब्दकोश करण्याचा संकल्प सोडला..''

''या कोशाची मध्यवर्ती संकल्पना तशी अभिनव नाही, हे प्रामाणिकपणे मान्य करून माझ्यामागे अनेक पूर्वसुरी उभे आहेत'' असे सांगून अनेक कोशकर्त्यांची नावे त्यांनी दिलेली आहेत. तर ऋणनिर्देश मध्ये ५०-६० व्यक्तींची नावेही दिलेली आहेत. संदर्भ 'ग्रंथसूची' मध्ये ४० ग्रंथांची नावेही दिलेली आहेत.

**'शब्दानंद'ला निळालेले पुरस्कार :**

- महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांचा २००७ सालचा कै. श्रीपाद जोशी (संदर्भ साहित्य, अनुवाद व आंतरभारती) पुरस्कार.
- महाराष्ट्र शासनाचा २००६-०७ सालचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती (ना.गो. कालेलकर) पुरस्कार.

● महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीचा २००७ सालचा 'होमी जहांगीर' पुरस्कार. साहित्यामध्ये कोशवाङ्मयाचे फार मोठे महत्त्व असते. म्हणून शाळा कॉलेजच्या व इतर खाजगी ग्रंथालयांनो व साहित्य संस्थांनी हा कोश आपल्या संग्रही ठेवावा ही आग्रहाची विनंती. या कोशाच्या निर्मात्या सौ. सांमत व प्रकाशक दत्तात्रेय पाष्टे यांचे अभिनंदन.

●●●

## 'मध्यरात्रीचा तो चंद्र'

वसंत गजानन देशपांडे (बी, ३०३, आनंदवन सोसायटी, आनंदपार्क, ठाणे (प.) ४०० ६०१) यांचे 'मध्यरात्रीचा तो चंद्र' हे अप्रतिम पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले आहे (पृ. ९६, मूल्य रु. १२०/-) प्रकाशक आहेत. व्यंगचित्रकार विवेक मेहेत्रे, उदवेली बुक्स, ठाणे (प.) ४०० ६०४.

या पुस्तकात 'सोनियाचा दिवस आजि अमृते पाहिला', 'विश्व म्हणजे काय रे भाऊ!' 'रंगांच्या विश्वात (अर्थात चित्रकलेची ओळख)', 'स्वरांच्या विश्वात' (अर्थात संगीत कलेची ओळख)', 'ज्येष्ठ नागरिकांच्या विश्वात' 'मंतिमंदांच्या विश्वात', 'पुस्तकांच्या विश्वात', 'मध्यरात्रीचा तो चंद्र' असे आठ माहितीपूर्ण लेख आहेत. निवृत्तीनंतर लेखकाला वाचनाची मोठी गोडी लागली. मधमाशीसारख्या संग्राहक वृत्तीमुळे विविध विषयांच्या वाचनातून वस्तुनिष्ठ उपयुक्त व माहितीपूर्ण मजकूर वेचून काढण्याची सवय त्यांच्या चांगलीच उपयोगी पडली.

सध्या जिनिव्हा येथे विश्वनिर्मितीचे रहस्य उकलण्यासाठी एक महाप्रयोग चालू आहे. साऱ्या जगाचे लक्ष त्याकडे लागलेले आहे. सुप्रसिद्ध लेखक डॉ. निवास पाटील यांनी 'आईन्स्टाईनचे विश्व' (प्रकाशक अनिरुद्ध कुलकणी, कॉन्टिस्टेंल प्रकाशन पुणे) हे एक अप्रतिम पुस्तक लिहिलेले आहे. विश्वाच्या निर्मितीपासून त्याचा अंत कसा असेल या संबंधीचे सखोल विवेचन त्यामध्ये केलेले आहे. त्या पुस्तकाचा आधार घेऊन 'विश्व म्हणजे काय रे भाऊ?' हा लेख त्यांनी लिहिला तो या पुस्तकात अंतर्भूत आहे. (इतर ही लेखांना विविध प्रकारच्या पुस्तकांचा आधार आहे.) या ब्रह्मांड निर्मितीच्या संदर्भात क्वांटम, क्वार्क महास्फोट' असे जे काही शब्द येतात त्यांची फोडही त्यांनी दाखवली आहे. 'मतिमंदांच्या विश्वात' व 'पुस्तकांच्या विश्वात' हे लेखही माहितीपूर्ण आहेत. इतिहास लेखक डॉ. दाऊद दळवी यांची विवेचक प्रस्तावना या पुस्तकास लाभलेली आहे. पुस्तक वाचनीय व संग्राह्य आहे. लेखक व प्रकाशकाचे अभिनंदन.

लेखकाची यापूर्वीची दोन पुस्तके. 'चला जाऊ लंडनला' (पृ. ५६, मूल्य रु. ५०/-) व 'खुणावणारे लिखाण व न सरणाऱ्या आठवणी' (पृ. १२०, मूल्य रु. १२०/-). पर्यटन करू इच्छिणाऱ्यांसाठी उपयुक्त मार्गदर्शन 'चला जाऊ लंडनला' या पुस्तकात आहे. शक्यतो कमी खर्च, थोडीशी कळ सोसून, अनावश्यक खर्च व चैन कशी टाळावी व जागतिक कीर्तीचे लंडन व युरोपची सहल कशी करावी त्यावेळी कोणकोणती काळजी घ्यावी याची माहिती या पुस्तकातून मिळते. लंडन शहरातील विविध प्रेक्षणीय स्थळांची सुबक छायाचित्रे हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे.

'खुणावणारे लिखाण आणि न सरणाऱ्या आठवणी' या पुस्तकात एकूण १३ लेख आहेत. त्या लेखांनाही अनेक प्रसिद्ध लेखकांच्या गाजलेल्या लेखाचा आधार आहे. सर्वश्री वामनराव पै (तुमचा उत्कर्ष तुमच्या हातात), डॉ. उर्जिता जैन (रंगीली मेंदी), राधिका कुंटे ('वाचाल तर वाचाल') केसरी टूर्सच्या वीणा पाटील ('पण... विस्मृतीत जाणारी सिंगापूर सहल!) इ. इ. ते लेखक आहेत. भरपूर माहिती आणि मनोरंजन करणारी ही पुस्तके वाचकांना निश्चित आवडतील.

**श्री. शरद जोशी (ग्रंथ प्रसारक)**
५, अमर कल्पतरू सोसायटी, देवी चौक,
शास्त्रीनगर, डोंबिवली - ४२१२०२
दूरध्वनी : ९५२५१२-४८६९६७

आपल्या कामात आनंद वाटणे म्हणजेच समृद्धी.

पुस्तक परिचय

# श्री देवी माहात्म्य
## (प्राकृत सप्तशती)

नवरात्रोत्सव म्हणजे दांडिया असा बहुतेकांचा समज झालेला असला तरी महाराष्ट्रीयन कुटुंबात पारंपरिक पद्धतीने नवरात्र नऊ दिवस बसते व त्यानंतर दसरा येतो. नवरात्राच्या नऊ दिवसात या श्रीदेवी माहात्म्य (प्राकृत सप्तशती) पोथीचे पारायण करण्याची प्रथा आहे. नवरात्राचा उत्सव अश्विन शुद्ध प्रतिपदा ते नवमीपर्यंत असतो. कोणी मातीची वेदी करत त्यावर घट स्थापन करून त्यावरील पात्रात दुर्गादेवीची मूर्ती ठेवतात व भोवताली धान्य पेरतात. काही ठिकाणी वेदी न करता कुळधर्माचे टाक मांडतात. काही घरी देवीला मखरात बसवून तिची पूजा केली जाते. झेंडूच्या फुलांची जोड माळ (८ फुलांची) तिच्यावर बांधली जाते. अशी प्रतिदिनी एक एक माळ वाढवली जाते. अखंड नंदादीप नऊ दिवस लावला जातो. कोणाकडे नऊही दिवस उपवास करतात. नऊ दिवस सवाष्ण, कुमारिका, ब्राह्मण यांना भोजनाला बोलावून पूजले जाते. कुठे उठती बसती सवाष्ण पूजली जाते. अष्टमीला घागरी फुंकणे, देवी अंगात येणे, देवीचा जोगवा मागणे, गोंधळ हेही नवरात्रात येते. त्याची कथा अशी आहे.



दक्ष प्रजापतीची मुलगी सती पित्याच्या मर्जी विरूद्ध शंकराशी विवाह करते. पित्याने बोलावले नसतानाही विसरले असतील, असे मोठ्या मनाने समजून माहेरी यज्ञासाठी जाते. दक्ष तिच्याकडे दुर्लक्ष करतोच पण शिवाय राहणीवरून तिचा अपमान करतो. आता मात्र तिला हे सहन न होऊन ती यज्ञात उडी मारते. शंकराला हे कळताच दु:खी होऊन येतात नि पार्वतीचा देह खांद्यावर घेऊन आकाशमार्गे जातात. त्यावेळी तिचा एकेक अवयव जिथे जिथे गळून पडला तिथे शक्तिपीठे निर्माण झाली. अशी भारतभर एकूण ५१ शक्तिपीठे आहेत आणि महाराष्ट्रात त्यातली साडेतीन पीठ आहेत.

एक पीठ ते तुळजापूर। द्वितीय पीठ ते माहूर॥
तृतीय पीठ ते कोल्हापूर। सप्तशृंगी अर्धपीठ॥ कवी त्र्यंबक

तुळजापूरची भवानी हे पूर्ण पीठ. २५०० फूट उंचीच्या बालाघाट डोंगरावर ते वसले आहे. श्री महिषासुरमर्दिनी तुळजाभवानी ही अष्टभुजा आहे. महिषासुराच्या उरावर पाय देऊन ती उभी आहे. देवीचे वाहन सिंह आहे. तिच्या हातात त्रिशूल आहे. ते महिषासूराच्या बरगड्यात खुपसलेले आहे. तिच्या दोन्ही पायांच्या मध्ये त्याचे शिर तुटून पडलेय. तिने हातात त्याची शेंडी धरलीय. शिवाय इतर हातात बिचवा, बाण, चक्र, शंख, धनुष्य, पानपात्र या वस्तू आहेत.

माहूर हे द्वितीय पूर्ण पीठ व शक्तिपीठही आहे. या रेणुका देवीला एकवीरा असेही म्हणतात. रेणुकामातेची तांबड्या रंगाची भव्य मूर्ती गळ्यापासून वरची आहे. शेंदूर माखलेला असल्यामुळे अत्यंत तेजस्वी अशी तिची मूर्ती आहे. ही अनेकांची कुलदेवता आहे. तिची साडी, खण, नारळाने ओटी भरतात. हिला तांबड्या रंगांची फुले फार प्रिय आहेत.

इथेच दत्तात्रयांचा जन्म झाला म्हणून दत्तात्रयाचे वास्तव्य एका गडावर आहे. हाच अत्री ऋषींचा आश्रम. दत्त भक्तांचेही हे आवडते स्थान आहे.

कोल्हापूरची महालक्ष्मी हे पूर्ण पीठ व प्राचीन शक्तिपीठही आहे. ही मूर्ती चतुर्भुज आहे. मूर्तीच्या मागे सिंह आहे. ही अनेकांची कुलदेवता आहे. साडी, खण, नारळाने सुवासिनी हिची ओटी भरतात.

सप्तशृंग निवासीनी श्रीदेवी ही 'सप्तशृंगी' असेही म्हणतात. हे अर्धपीठ व शक्तिपीठही आहे. या पर्वताला सात शिखरे आहेत म्हणून सप्तशृंग म्हणतात. देवीच्या पीठाच्या समोरच्या डोंगराला मार्कंडेयाचा डोंगर म्हणतात. पर्वत शिखराच्या कपारीत महिरपात आठ फूट उंच अशी सप्तशृंगी देवीची मूर्ती कोरली आहे. अतिशय भव्य शेंदूर चर्चित रक्तवर्णी आहे. हिला अठरा हात आहेत म्हणून अष्टादशभुजा महालक्ष्मी म्हणतात. देवीने डावा हात कानावर टेकवला आहे. ती विचारमग्न आहे. पूर्वाभिमुख असलेली ही मूर्ती सकाळी बाला, दुपारी तरुणी व सूर्यास्तानंतर वृद्ध दिसते. हिने महिषासुराचा वध केला म्हणून हिला महिषासुरमर्दिनी म्हणतात.

आदिशक्ती अंबिकेच्या महाराष्ट्रातील साडेतीन पीठांची माहिती करून घेतल्यानंतर या ''देवी माहात्म्य'' (प्राकृत सप्तशती) या पोथीचीही माहिती करून घेऊ या. माझ्याकडे ज्योती प्रकाशनाची 'श्री देवी माहात्म्य' ही पोथी आहे. श्री रामबाबा वर्णेकर यांनी १८५९ मधे सातारा जिल्ह्यातील वर्णे गावी पांडुरंगाच्या मंदिरात ती लिहिली. माझ्याजवळ १९८८ ची आवृत्ती आहे. त्यात शक्तिपीठांची ही माहिती आहे. फोटोही आहेत. मुखपृष्ठावर सिंहावर विराजमान झालेल्या अष्टभुजा देवीचे रंगीत छायाचित्र आहे.

श्री सप्तशतीचा पाठ करण्यापूर्वी श्री चंडीकवच, तसेच श्री अर्गलास्तोत्र, श्रीकीलक म्हणण्याचा प्रघात आहे. म्हणून ही तिन्ही स्तोत्रे पोथीच्या शेवटी दिली आहेत. ती आधी म्हणावीत म्हणून शेवटी दिली आहेत. तिचे रोज पारायण करावे, नऊ दिवसांत पूर्ण करावे किंवा सोळावा अवतरणिकेचा अध्याय तरी वाचावा. या पोथीचे १६ अध्याय आहेत व सतराशे नऊ ओवीसंख्या आहे. मार्कंडेय पुराणातील श्री सप्तशतीच्या तेरा अध्यायांचे रामबाबांनी पहिल्या तेरा अध्यायात रूपांतर केले आहे. नंतर मार्कंडेय पुराणातील वैकृतिक रहस्य, प्राधानिक रहस्य व प्राकृत चौदा, पंधरा व सोळा अध्यायात केले आहे. हा ग्रंथ उत्तम रसाळ असून प्रासादिक आहे. १८५९ मध्ये जिथे ही पोथी लिहिली गेली ते पांडुरंगाचे मंदिर आता निर्जन व पडक्या अवस्थेत आहे.

मंगलाचरणाने पोथीची सुरुवात होते.

आदिमाया प्रणवरूपिणी॥ जी अनंतशक्तीची स्वामिनी॥
जी अनंत अवतार घेऊनी॥ भक्ताप्रती रक्षीतसे॥३१॥

श्रीविष्णुच्या देहापासून॥ महाकाली अवतार घेऊन॥
मधु-कैटमदैत्यमर्दन॥ विष्णुहस्ते करविले॥३२॥

हा देवीचा प्रथम अवतार॥ सांग आम्हां याचा विस्तार॥
द्वितीय अवतारी महिषासुर॥ महालक्ष्मीने मारिला॥३३॥

सर्व देवांच्या तेजापासून॥ महालक्ष्मी झाली उत्पनन॥
तयाचे सांग आम्हां कथन॥ विस्तारूनी सर्वथा॥३४॥

पार्वतीच्या देहापासून महासरस्वती अवतार घेऊन॥
शुंभ निशुंभ दैत्य दारूण॥ तिसरे अवतारी मारिले॥३५॥

कृष्ण चतुर्दशीचे दिवशी॥ अथवा कृष्ण अष्टमीसी॥
अथवा नवरात्री विशेषी॥ फल अपार पठणाचें॥४५॥

पहिल्या अध्यायातल्या या काही ओव्या वर उदृधृत केल्या आहेत. पूर्ण पोथी प्रासादिक, ओघवत्या भाषेत आहे. देवी भक्तांनी या पोथीचे पारायण करणे आवश्यकच होय!

या देवी सर्व भुतेषु शक्तीरूपेण संस्थिता।
नमस्तयै नमस्यै नमस्तयै नमोनम:॥

**आशा भिडे**
बी/९ विजय अर्पाटमेंटस्,
आराधना टॉकीजजवळ,
ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी - २५४१०१४०
मोबाईल - ९३२४०४४७६४

●●●

# भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना

*भारतीय संस्कृतीचे अलौकिक व दिव्य वैशिष्ट्य जपणे का आवश्यक आहे ह्यावरचे हे विचार - संपादक*

दिशा मासिकाच्या मागील तीन/चार अंकात भारतीय संस्कृतीच्या बीज संकल्पनेची चर्चा केली. कां बरे ह्या बीज संकल्पनेचे एव्हढे महत्त्व?

ह्या प्रश्नाच्या रोखाचा उलगडा होण्यासाठी प्रथम आपण संस्कृती कशाला म्हणजो व त्यांतही 'भारतीय' अशा वैशिष्ट्यांची संस्कृती कोणती, हे पहाणे प्रस्तूत ठरेल नाही काय?

पुष्कळशा शब्दांचे अर्थ आपण अतिशय सैल अर्थाने वापरतो असे मला वाटते. प्रथम 'बीज' ह्या संकल्पनेचा आपल्याला खरा बोध झालेला नसतो. एखाद्या वृक्षाच्या जमीनीवरील विस्तारावरून, त्याच्या पान, फुले व फळे ह्यांच्या विशिष्ट जातीवरून आपण त्या झाडाला ओळखतो. पिंपळ, वड, औदूंबर, पळस ही झाडे देववृक्षांत गणली जातात. रत्नागिरीला देवरूखला, जे माझे 'कुलगांव' आहे. तिथे 'राममंदिराच्या' जवळच असलेल्या वृक्षांना 'देववृक्ष' असे संबोधण्यात येते. त्याची कारणे मला मिळवतां आली नाहीत. पण आपल्या संस्कृतीत १० **'ब्राह्मण वृक्ष'** आहेत. अश्वत्थ (पिंपळ), वड (न्यग्रोध), पळस (पलासवृक्ष) अशी तीनच प्रथम बघु या. अश्वत्थाचा उल्लेख भगवद्‌गीतेत १५ व्या अध्यायात आहे. ''उर्ध्वमूल अध:शाख अश्वत्थम् प्राहुरण्ययम् ---॥''

न्यग्रोध (वड) ह्या वृक्षाचा उल्लेख वेदांमध्ये अनेकदा आला आहे. पळस - पलास हा वृक्ष मेधासुक्तात आला आहे. उपनयन संस्कारात ह्या वृक्षाला 'मेधा' शक्तीच्या साधनेला उपयुक्त असे स्थान आहे. **'पळस वृक्षा तूं जसा ब्रह्मज्ञानाचा उत्तम श्रोता आहेस तसा मला कर'** अशी प्रार्थना 'बटू'ने (मुंज - उपनयन करणाऱ्या मुलाने) सूर्याकडे करावयाची असते. ह्या करिता गायत्रीमंत्र म्हणून व त्याच्या नादानुसंधान क्रियेने सूर्य - सविता ह्या वैश्विक देवतांकडून 'मेधा' नावाची स्पिरीच्यूअल शक्ति आपल्या जीवात्म्याला मिळवावयाची असते. ह्यामुळे प्राणीजीवनाच्या पातळीवर असलेल्या त्या बटूला ब्रह्मज्ञानाला आवश्यक असलेली शक्ति व दृष्टि आणि प्रेरणा प्राप्त होत असते. अर्थात ह्या क्रिया आजकाल शिकवणारे गुरु दुर्लभ झाल्याने त्याचा प्रत्यय सामान्य जनतेला येत नाही ही एक खेदाची गोष्ट आहे. माझे 'सध्दर्म' ह्या डॉ. विजय बेडेकर संपादित त्रैमासिकातील 'उपनयन संस्कार' ह्यावरील लेख वाचावा. त्यामध्ये व दिशाच्या काही अंकात मी ह्या शास्त्रावर पुष्कळ मार्गदर्शन केले आहे.

पण, मुद्दा इतका महत्त्वाचा आहे कीं वनस्पती जीवनाकडे एखाद्या अलिप्तपणे किंवा केवळ 'भौतिक सुखासीन उपयुक्तता वादाच्या' भूमिकेतून भारतीय संस्कृति बघत नाही, तर मानवाच्या प्राणीजीवनातून दैवी जीवनाकडे जाणाऱ्या उत्क्रांतिमार्गावर ह्या काही वनस्पतींच्या सामर्थ्याचा कसा उपयोग केला जातो आहे हे जाणले व उपयोगांत आणले आहे.

आता जसे ह्या वृक्षांचे हे गुण त्यांच्या 'बीज' ह्या मूळ संकल्पनेत योजिले आहेत, तसेच ''भारतीय संस्कृतीचे मूळ बीज'', हे विश्वाच्या उत्क्रांतिच्या मूळ बीजांत निर्माण करून त्या निर्मात्याने त्याच्या अनंतकाळच्या योजनेसाठी ह्या बीजाची निर्मीती सातत्याने होईल व युगानुयुगे ही साधने मानवी समाजाला प्राप्त होतील अशी योजनाही केलेली आहे.

पुढे ओघाने अशा अनेक गोष्टी आपण बघुया. पण

कुठल्याही, आपल्याला माहीत असलेल्या, ऐतिहासिक किंवा सध्याच्या जिवंत संस्कृत्यांमध्ये, अशा तऱ्हेचे नाते, म्हणजे प्रकृति व जीवात्मा मध्ये आहे अशी जाणीव नाही. **<u>एव्हढेच नव्हे तर अशा गूढ नातेसंबंधांचे शोध लावून त्यांचा मानवीसमाजाच्या आध्यात्मिक उन्नतिसाठी, गुणात्मक संस्कार क्रियेसाठी उपयोग करणाऱ्या व्यावहारिक शास्त्रांची बांधणीही, केवळ भारतीय संस्कृतीतच सापडेल.</u>**

ह्या माझ्या विधानांवर कदाचित विश्वास बसणार नाही. कारण पाश्चात्यांच्या या युगांतल्या ''समानता'' 'Equality' ह्य उदार मतांच्या सिद्धान्तावर किंवा तत्वावर आपला अज्ञानी विश्वास आहे. निसर्गामध्ये 'Equality' म्हणजे 'Mechanical Equality' अशी संकल्पना किंवा नियम नाही. ''Spiritual Equality'' अशी एक अत्यंत व्यापक व उच्च पातळीवरची संकल्पना आहे.

पिंपळाच्या झाडाची पाने वडाच्या झाडाप्रमाणे म्हणजे त्यांच्या पानापेक्षा भिन्न आकाराची, रंगाची, स्पर्शाची व गुणांची असतात. पण, त्यामुळे ती वेगळी आहेत हे समण्यासारखे आहे. पण, पिंपळाच्या झाडाची एका वेळची पाने ही वेगवेगळ्या आकाराची, काही जीर्ण काही तरुण नवीन पालवी फुटलेली अशी असतात.

पण, पिंपळाची पाने म्हणून त्यांच्या आकाराला एक अत्यंत बहरदार व सौदर्यपूर्ण असे निमूळते टोक असते व ते सर्व पानांना असते.

ह्याचाच अर्थ 'एकता व विविधता' ही एका समन्वयाने व एका 'जीवनहेतूने बांधलेली असते. ही संस्कृती भेदावर आधारलेली, विभक्त जीवनतत्वावर, संघर्षात्मक भेदनीनीवर आधारलेली नाही तर **<u>'वैविध्यातही एकात्म'</u>** जपणाऱ्या नातेसंबंधावर आधारलेली आहे. सर्वसाधारणपणे, सामान्य माणूस ही भावना नैसर्गिकपणे बाळगत नाही. पण म्हणूनच तो प्राणी जीवन संस्कृतीचा घटक (सध्या) आहे. Anlmalistic प्रवृत्तीचा आहे!!

भारतीय संस्कृतीत त्याच्या ह्या सद्यस्थितीपासून ह्या जीवात्म्याला ताब्यात घेऊन जाणीवपूर्वक व निसर्गाच्या मदतीने, परमेश्वराच्या योजनेप्रमाणे व आध्यात्मिक उन्नतिच्या संस्कार क्रियामार्फत खऱ्या खुऱ्या उच्च दैवी पातळीवर म्हणजे 'Divine' पातळीवर नेण्याचा अत्यंत तेजस्वी, योजनाबद्ध व अव्यक्त जगांतील देवतांना आवाहन करून, विशेषत: 'अग्नि' ह्या देवतेला आवाहन करून, तिच्या मार्फत इतर मदतीनेही १६ संस्कार क्रियांच्या वापराने हा कार्यक्रम राबवण्याची योजना हजर आहे.

फक्त या मार्गाबद्दल आपण अनाभिज्ञ रहात आहोत किंवा अनुत्सुक आहोत.

स्वामी दयानंद यांनी १६ संस्कार विधीवर पुष्कळ संशोधन करून एकत्र ग्रंथ निर्मीती केली आहे. त्याची हिंदीत व इंग्रजीतही पुस्तके उपलब्ध आहेत. इंग्रजीमध्ये ''The Sanskar Vidhi'' असे आचार्य वैद्यनाथ शास्त्री यांनी भाषातर व संकलन केलेले पुस्तक सर्व देशिक आर्य प्रतिनिधी सभा ३/५ दयानंद भवन, रामलीला ग्राऊंड, न्यू दल्ही - ११०००२ (India) http://www.whereisgod.com, http://www.sarvadeshik.org,

Email : Vedicgod@nda.vsnt.net.insaps@tatanova.com वर संपर्क साधू शकाल.

''दैशिक शास्त्र'' ह्या श्री. १०८ सोंबारी महाराज यांनी दिलेल्या ज्ञानावर आधारीत ह्या संस्कार शास्त्राची वेदिक आध्यात्मिक कल्पना येऊ शकेल. ह्याचे सविस्तर वर्णन मी दिशाच्या अंकातील सांखळी पद्धतीने लिहीलेल्या लेखांत सापडेल, पण थोडक्यात साध्या भाषेत सांगावयाचे तर ह्या जगांत जन्माला येणारा कोणताही माणूस हा 'जीवात्मा' ह्या आध्यात्मिक संकल्पनेचा, प्रकृति (Nature) ह्या रचनेतील, एक 'शरीर बद्ध आत्मा' असतो. (Embodied Consciousness). त्याचा प्रवेश

पृथ्वीवरीलच स्त्री पुरुष संबंधातून अवतरतो. त्याच्या ह्या प्रवेशापूर्वीपासून व प्रवेशानंतरही 'हिंदू संस्कृतीने' जपलेले काही संस्कार व प्रार्थना आखीव पद्धतीने अस्तित्वात आहेत. फक्त, त्यांतील गूढ देवता, अग्नि ह्यांच्या आवाहनाच्या व कृतीच्या योजना आज लुप्त झाल्या आहेत. **म्हणजे ते जाणणारे ज्ञानी पुरुष, स्त्रिया, आचार्य आज दिसत नाहीत. संस्काराचे अग्नि देवतेवर आधारलेले वैश्विक स्व संवेद्य यंत्र अनंत काळ अस्तित्वात आहे.**

पण, महत्वाचा मुद्दा हा आहे कीं कुठला जीव पृथ्वीच्या कुठल्या भागांत जन्माला येतो व त्याच्या जन्मजन्मांतरीच्या जीवनक्रमावर, कोणाची नियंत्रण संस्था काम करते व 'नियमक' कोण ह्याबद्दल पूर्ण अज्ञान व या जिज्ञासेचा सुद्धा अभाव आहे. ही जाणीव फक्त 'भारतीय संस्कृतीने' जपली आहे.

**glimose into the unique aspiration the people of India :**

**Says the Bhagavata :**

एतदेव हि देवा गायन्ति॥
अहो अमीषां किमकारि शोभनं
प्रसन्न एषां स्विदुत स्वयं हरिः।
यैजंन्म लब्धं नृषु भारताजिरे
मुकुन्दसेवौपयिकं स्पृहा हि नः॥
किन्दुष्करैनंः ऋतुभिस्तपोव्रतैर्-
दानादिभिर्वा द्युजयेन फल्गुना।
न यत्र नारायणपादपङ्कजे-
स्मृतिः प्रमुष्टातिशयेन्द्रियोत्सवात्॥
कल्पायुषां स्थानजयात्पुनर्भवात्
क्षणायुषां भारतभूजयो वरम्।
क्षणेन मर्त्येन कृतं मनस्विनः॥

**उतारा नं १**

ह्या भागवतातील उताऱ्याचा मतीतार्थ हा आहे की एखाद्या जीवात्म्याचा जन्म एखाद्या विवक्षित देशात किंवा भूभागावर होतो हा काही जुगारातील फांस टाकण्याचा खेळ नव्हे - चान्स नव्हे, तर हा एक (दैवी) निर्णय व (दैवी) कृपा होय. स्वर्गातील देवदेवतांना भारतात जन्म घेण्याचा लोभ वाटतो त्याचे काय बरे कारण असेल?

भारतात जन्म घेऊन एक दुर्लभ अशी आत्मोन्नतीची संधी मिळते, त्या उलट ह्या स्वर्गीय स्थानी 'इंद्रियांच्या उत्सवात' दंग होऊन मात्र पदरात खरोखर काही मूल्यवान भर पडत नाही.

तेव्हा अशा अपूर्व संधी प्राप्त झालेल्या 'जीवात्म्यांना' 'पृथ्वीवर - भारतात' अशी कोणती कामगिरी पार पाडवयाची संधी प्राप्त होते? ह्या जीवनात्म्यांना एक खोल, गूढ व दिव्य अशी प्रेरणा जन्मतःच प्राप्त होते. तिचे वैशिष्ट्य काय आहे? ह्या जीवात्म्यांना ह्या प्रेरणेच्या जागृतीनंतर तिचे कार्य एका विशेष संस्कृतीच्या मूल्य निर्मातीमध्ये, ह्या मूळ बीज प्रेरणेला अनुषंगून कला, नृत्य, गायन, साहित्य, समाजरचना, मूल्याधिष्ठित संस्कार क्रिया, जीवसृष्टीचा परस्पर संबंधातील सुसंस्कृत व सुसंवेदना युक्त नातेसंबधाच्या रचना यांचा विस्तार व मांडणी करण्यात योगदान करता येते. हाच आहे वेदिक बीजाला अनुसरून होणारा संस्कृति विस्तार (Cultural Manifesfation) त्याचे प्रत्यक्षीकरण हे आपण कालीदास, हरीशास्त्री, भरत मूनी यांच्या अविष्कारात पाहिले आहे. तुलनेने या सांस्कृतिक अविष्कारात काही वैशिष्ट्ये केवळ भारतीय 'दैवी' जातीची आहेत असे दिसेल. त्यांची काही उदाहरणे आपण सविस्तरपणे नंतर पाहूंच!!

ह्यावर श्री. एस. के. मित्रा काय म्हणतात ते पाहूया. त्यांच्याच शब्दात -

''India has been the home of many religions. But, for centuries the religigon of ancient India was Hinduism. It has permeated the whole

of life of the people and is so rich and wide and deep and complex that even the sharpest minds get lost and ask whether it is one religion or many religions.

They are unable to grasp the fundamental truth underdying this great religion to perceive the unity in the multitndinous variety, the one



**चित्र त्रिमूर्ती**

**The Gods of India :**

Hinduim has been a great binding and unifying force for the nation. Vishnu, the all pervading, all sustaining Godhead, Shiva, the Lord of Tapas, of divine dertruction, Ganesha of divine knowledge, always the first to be worshipped, whether in the north or the southe, the east or the west, and Hanuman, the faithful servitor of the Divine, the destroyer of all obstacles - none of these gods is alien to any Indian and therefore no place is alien to him, whatever may be his state of origin. The legends are common heritage and what the traveller finds in actual practice the devotee remembers in his daily prayer, that his own god and deity is worshipped in all parts of the land.

The following passage, dear to every devout. Hindu, enumerater the various places of Shaiva worship scattered throughout the whole of India :

सौराष्ट्रे सोमनाथश्च श्रीशैले मल्लिकार्जुनम्।
उज्जयिन्यां महाकालमोङ्कारे परमेश्वरम्॥
केदारं हिमवत्पृष्ठे डाकिन्यां भीमशङ्करम्।
वाराणस्यां च विश्वेशं त्र्यम्बकं गौतमीतटे॥
वैद्यनाथं चिताभूमौ नागेशं दारूकावने।
सेतुबन्धे च रामेशं घुश्मेशं च शिवालये॥
द्वादशैतानि नामानि प्रातरुत्थाय यः पठेत्।
सर्वपापविनिर्मुक्तः सर्वसिद्धिफलं लभेत्॥

supreme behind not only the thirty million gods but behind every object in the universe, the one who can be approached through as many paths as there are persons. This "Synthetic Vision of Hinduism", has found some of its most beautiful expressions in the forms in which the Supreme is worshipped.

Ardhanariswara, Hara-Hari, Trimurti. It would be difficult to find a religion which has been the source of such a great unity and diversity in a people."



**(अर्धनारीश्वर कुंभकोणम)**

भौगोलिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक पातळीवर ह्या जीवात्म्याच्या पृथ्वीवरील कार्यक्षेत्राचे जरी फाळणी मार्फत अनेक भेद दिसले तरी त्याचे आत्मिक ऐक्य एका विलक्षण स्वरूपांत पांडिचरीच्या ''The Mother'' ह्यांनी कसे पाहिले हे बघणे उद्बोधक ठरेल. त्या म्हणतात -

''The boundaries of conntries may change with political fluctuations. But there is also a deeper reality behind which the forms seek to realise and to manifset.

The Map of true India includes Pakistan, Nepal, Sikkim, Bhutan, Bangladesh, Burma and Sri Lanka

In spite of the present circumstances they are all one in their soul and spirit.''

- The Mother



**The Mother in front of India's Map**

Beyond the physical unity lies a deeper unity - the cultural. A nation, like an individual, has its longings and seekings, its likes and feelings, its joy of life and power of manifestation. These find their expression in the people, their character, their literature, their philosophy, their arts, their festivals and their celebrations. It is fascinating to see how India is culturally a single rich enlity with its own distinctive expressions.

महायोगी अरविंद म्हणतात -

Mother India is not a piece of earth;

She is a Power, a Godhead

- Sri. Aurobindo

ह्या छोट्या लेखात मी एक महत्वाचा मुद्दा उपस्थित करतो आहे तो म्हणजे भारतीय संस्कृतीचा विस्तार हा तिच्या वेद बीजाच्या मूळ संकल्पनेबरहुकूमच होत आहे. इतर संस्कृतींचे आक्रमण जरी ह्या भूमीवर झाले तरीही भारतीय वेदीक बीजावर निर्माण झालेल्या मूळ संस्कृतीचे वैशिष्ट्य हे आहे की ती ईश्वरी इच्छेने व संदर्भाने विस्तारत आहे. सध्याच्या प्रचलित संस्कृती दर्शनांत जे विरोधी सूर व रंग दिसतात त्या विकृति आहेत व त्यामुळे मूळ शुद्ध संस्कृतीच्या नैसर्गिक व ईश्वरप्रणीत संस्कृतीच्या प्रसारात अडथळे निर्माण होत आहेत.

प्रश्न हा विचारला जाऊ शकेल कीं असे कोणते मोठे गुण ह्या भारतीय संस्कृतीत आहेत कीं तिच्या शुद्ध प्रसाराबद्दल आपण जागृत रहावयाला हवे?

हे सर्व प्रश्न आपण पुढल्या दिशाच्या अंकात पाहू या.

॥ कृष्णार्पणमस्तु ॥

**यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी, अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
E mail;: yrsane@eth.net

●●●

# मराठी वर्णक्रम नियमावली

*दिशाचे जुने हितचिंतक, वाचक व लेखक श्री. श्रीनिवास आठल्ये यांनी वर्णक्रम नियमावली संबंधात केलेले विचार या लेखात आहे. स्वत: ग्रंथपाल असल्याने हा त्यांचा संशोधनाचा विषय आहे. लेखा खालील ग्रंथांची यादी ही केवळ नोंद आहे. सूचिशास्त्रानुसार तिची रचना नाही - संपादक*

## विभाग एक : निरीक्षणे

**प्रस्तावना :**

अक्षरांची, शब्दांची किंवा वाक्यांची यादी करताना त्यांचा अनुक्रम माहीत असणे आवश्यक असते. मराठीत पारंपरिक असे मुख्य १२ गौण ३ व आंग्लोतर २ असे एकूण १७ स्वर आहेत. ते असे :-

१) मुख्य स्वर : अ आ इ ई उ ऊ ए ऐ ओ औ अं अ:

२) गौण स्वर : ऌ ऋ ॠ

३) आंग्लोत्तर स्वर : ॲ ऑ

यातील ऌ, ऋ व ॠ यांचे स्थान भिन्न आढळते. तसेच ॲ व ऑ यांच्या स्थानांबाबतही एक वाक्यता नाही. ('ॲ' या उच्चारही बऱ्याचदा 'याऽ' असा केला जातो.) वेगवेगळ्या अभ्यासकांनी याबाबत काटकोर धोरणाचा पाठपुरावा न करता आपापल्या वापरापुरती त्यांची स्थाने निश्चित करून वेळ निभावून नेलेली दिसते. मात्र त्याचे परिणाम पुढीलप्रमाणे दिसून येतात:-

१) शब्द वापरात विविधता येते.
२) वाचकांना आधी पद्धत समजावून घेत बसावे लागते. यात वेळ व श्रम यांचा व्यर्थ व्याय होतो.
३) एकाच अक्षराच्या वेगवेगळ्या जागा निश्चित केल्याने वाचकांचा गोंधळ उडतो.
४) प्रमाणबद्धता राहात नाही.
५) सूक्ष्म स्तरापर्यंत वर्णक्रम अनुसरला जात नाही.
६) प्रत्येक संदर्भ ग्रंथांत आधी वर्णक्रमाची रचना देत बसावे लागते. त्यामुळे निष्कारण वेळ जातो.

वरील त्रुटींचा विचार करता वर्णक्रमाच्या प्रमाणित नियमावलीची कमतरता जाणवते. यासाठी प्रस्तुत संशोधकाने विविध संदर्भ ग्रंथांचा अभ्यास केला. परंतु समाधानकारक माहिति कोणत्याच ग्रंथात मिळाली नाही. तेव्हा पूर्ण समाधानकारक उत्तरासाठी, तसेच पुढील उद्दिष्टपूर्तीसाठी प्रस्तुत संशोधन हाती घेतले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) वर्णक्रमाची सुसंगत व तार्किकदृष्ट्या सुयोग्य अशी नियमावली उपलब्ध आहे का ते पाहणे.
२) विविध संदर्भ ग्रंथांतून वेगवेगळ्या पद्धतींनी केलेला वर्णक्रमांचा वापर अभ्यासणे.
३) प्रचलित वर्णक्रम नियमावलीनुसार सूक्ष्म स्तरापर्यंत रचना करता येते का ते पाहणे.
४) विरमचिन्हे व गणिती चिन्हे यांचे वर्णक्रम रचनेतील स्थान अभ्यासणे.
५) प्रमाणित अशी वर्णक्रम नियमावली तयार करुन अभ्यासकांना एक संदर्भसाधन उपलब्ध करुन देणे.

**संशोधनाची गरज :**

या संशोधनामुळे वर्णक्रम नियमावलीबाबत अभ्यासकांमध्ये सतर्कता निर्माण होईल. अचूक वर्णक्रम राखण्यासाठी संदर्भसाधन उपलब्ध होईल. नियमावली प्रमाणित राखता येईल. विद्यार्थी, अभ्यासक सूचीकार, शब्दकोशकार, संदर्भ साधनांचे निर्माते, लेखक, चरणसूचीकार यांना आधारभूत साधन म्हणून या

संशोधनाचा वापर करणे शक्य होईल.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. त्यासाठी पाहणी तंत्राद्वारे माहिती संकलन केले आहे. निवडक अशा वीस संदर्भ ग्रंथांची पाहणी करण्यात आली आहे. माहिती संकलनासाठी विशिष्ट मुद्यांच्या आधारे प्रश्नावली तयार करण्यात आली असून त्याद्वारे माहिती भरुन घेण्यात आली आहे.

**माहितीचे संकलन व सादरीकरण :**

१) 'अं' व 'अ:' या स्वरादींचे स्थान कुठे आहे?

मराठीत आकार विल्हे रचना करताना अं व अ: यांचा प्रश्न नेहमीच उद्भवतो. या कोशात त्यांची रचना कशी केली आहे ते जाणून घेण्यासाठी हा प्रश्न विचारला आहे. त्यासाठी (अ) 'अ' च्या आधी (ब) 'अ' च्या नंतर (क) 'औं' च्या नंतर (ड) यापैंकी नाही असे चार पर्याय दिलेले आहेत.

२) 'अॅ' व 'ऑ' या स्वरांचे स्थान या कोशात कुठे आहे?

'अॅ' व 'ऑ' हे स्वर आंग्ल भाषेतून मराठीत आलेले आहेत, त्यांना पारंपरिक स्थान नसल्याने या कोशात त्यांचे स्थान कोठे आहे, हे जाणून घेण्यासाठी हा प्रश्न विचारला आहे. त्यासाठी (अ) 'अॅ' चे 'अ:' नंतर व 'ऑ' चे 'आ:' नंतर (ब) 'अ:' नंतर 'अॅ' व 'ऑ' एकत्रित (क) 'औ' नंतर 'अॅ' व 'ऑ' एकत्रित (ड) 'अ' नंतर 'अॅ' व 'आ' नंतर 'ऑ' (इ) यापेक्ष अन्य असे पाच पर्याय दिले आहेत.

३) दोन शब्दांतील मोकळ्या जागेचे स्थान कुठे आहे?

कधीकधी काही अक्षरे एखाद्या वाक्यात सलग तर कधीकधी विच्छेदित रूपात असतात. त्यांचा क्रम कसा लावला आहे, हे जाणून घेण्यासाठी या प्रश्नाचे उपयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी (अ) सलग अक्षरांच्या आधी (ब) सलग अक्षरांच्या नंतर (क) यापेक्षा अन्य असे तीन पर्याय देण्यात आले आहेत.

४) जोडाक्षरांचे स्थान कुठे आहे?

जोडाक्षरांचे स्थान कोणत्या क्रमाने विचारात घेतले आहे हे समजावे, हा या प्रश्नामागचा हेतू आहे. त्यासाठी (अ) पूर्ण व्यंजनाक्षराच्या आधी (ब) पूर्ण व्यंजनाक्षराच्या नंतर (क) यापेक्षा अन्य असे तीन पर्याय दिले आहेत.

५) विरामचिन्हांचे स्थान कुठे आहे?

शब्दांच्या मध्ये अथवा शेवटी विरामचिन्हे बऱ्याचदा आढळतात. त्यांचा क्रम कसा लावला आहे, हे समजण्यासाठी हा प्रश्न विचारात घेतला आहे. त्यासाठी (अ) स्वरांच्या व प्रत्येक व्यंजनाच्या आधी (ब) स्वरांच्या व प्रत्येक व्यंजनाच्या नंतर (क) यापेक्षा अन्य असे तीन पर्याय दिले आहेत.

६) गणिती चिन्हांचे स्थान कुठे आहे?

शब्द कधीकधी गणिती चिन्हांसोबतही असतात. त्यांचा क्रम कसा लावला आहे हे समजण्यासाठी हा प्रश्न विचारण्यात आला आहे. त्यासाठी (अ) विरामचिन्हांच्या आधी (ब) विरामचिन्हांच्या नंतर (क) यापेक्षा अन्य असे पर्याय देण्यात आले आहेत.

७) अंकांचे स्थान कुठे आहे?

शब्दांसोबत अनेकदा अंकही असतात. त्यांचा क्रम कसा लावला आहे हे जाणून घेण्यासाठी हा प्रश्न विचारात घेतला आहे. त्यासाठी (अ) स्वरांच्या आधी (ब) स्वरांच्या नंतर व प्रत्येक व्यंजनाच्या आधी (क) यापेक्षा अन्य असे तीन पर्याय दिले आहेत. पर्याय कोशकारांनी निवडलेले दिसून येतात. याचे प्रमाण अनुक्रमे ०%, ०% आणि १००% इतके आहे.

८) सातव्या प्रश्नातील संकलित माहितीनुसार अ = ०, ब = ० आणि क = २० असे पर्याय कोशाकारांनी निवडलेले दिसून येतात. याचे प्रमाण ०%, ०% आणि १००% आहे.

**निरीक्षणे :**

१) पहिल्या प्रश्नाच्या विश्लेषणावरुन असे लक्षात येते की ३५% कोशकारांनी अ हा पर्याय निवडला आहे २०% कोशकार ब किंवा क पर्याय स्वीकारतात. २५% कोशकार वरीलपैकी कोणतीच पद्धत निवडत नाहीत. काही अनुस्वारासहित अक्षर हे अनुस्वाररहित समजून रचना करतात.

२) दुसऱ्या प्रश्नाच्या विश्लेषणावरून असे लक्षात येते की ५% कोशकार अ पर्याय निवडतात तर ४५% कोशकार ड पर्याय निवडतात. ५०% कोशकार अन्य पर्याय निवडतात. हा पर्याय त्यांनी स्वत:ही निर्माण केलेला असू शकतो.

३) तिसऱ्या प्रश्नाच्या विश्लेषणावरुन असे लक्षात येते की अ पर्याय ५% कोशकारांनी निवडला आहे तर क पर्याय ९५% कोशकारांनी निवडला आहे. बहुतांश कोशकारांनी मोकळ्या जागेच्या विचारच केलेला दिसत नाही.

४) चौथ्या प्रश्नाच्या विश्लेषणावरुन असे लक्षात येते की अ पर्याय ५% ब पर्याय ५०% तर क पर्याय ४५% कोशकारांनी निवडला आहे. क पर्याय निवडलेल्यांनी रचनेत विविधता दर्शवली आहे.

५) पाचव्या प्रश्नाच्या विश्लेषणावरून असे लक्षात येते की विरामचिन्हांबाबत एकाही कोशकाराने विचार केलेला नाही.

६) सहाव्या प्रश्नाच्या विश्लेषणावरून असे लक्षात येते की गणिती चिन्हांबाबत एकाही कोशकाराने विचार केलेला नाही.

७) सातव्या प्रश्नाच्या विश्लेषणावरुन असे लक्षात येते की अंकांबाबत एकाही कोशकाराने विचारच केलेला नाही.

**निष्कर्ष:-**

१) मराठी विश्वकोशाची रचना अकारविल्हे नसून अंकारविल्हे आहे. बहुतेक कोशकार प्रमाणित वर्णक्रम रचनेबाबत फारसे उत्सुक नसल्याने ते मराठी विश्वकोशास आदर्श मानून रचना करतात.

२) जोडाक्षरे व मोकळ्या जागेसंबंधी ठाम नियम असायला हवेत. प्रत्येक कोशकाराच्या स्वतंत्र निर्णयाने रचना समजून घेण्यास त्रास होतो.

३) विरामचिन्हे, गणिती चिन्हे व अंक यांचा कोणत्याच कोशाकाराने विचार केला नाही.त्यामुळे यांच्याबाबतच्या नियमांची आवश्यकता आहे.

**शिफारस :**

१) अकारविल्हे रचनेबाबत तर्कसंगत व नियमबद्ध प्रणालीबाबत अधिक विचार कोशकारांनी करावा.

२) प्रमाणभूत अशा वर्णक्रम नियमावलींची रचना करण्यास हरकत नाही.

## विभाग दोन : नियमावली

प्रस्तुत संशोधनातील शिफारस क्रमांक दोन अनुसार प्रमाणभूत अशी नियमावली पुढे दिलेली आहे.

### १) नियम क्रमांक १ :

मराठी भोषेतील स्वरांची व व्यंजनांची रचना पुढीलप्रमाणे असेल.

**१.१) स्वर :**

| | |
|---|---|
| अ, अं, अः, अॅ | आ, आं, आः, आॅ |
| इ, इं, ई, ईं | उ, उं, ऊ, ऊं |
| ऋ ऋं ऋ ऋ लृ | ए एं ऐ ऐं |
| ओ ओं ओ: औं औं | |

**१.२) व्यंजने :**

| | |
|---|---|
| क ख ग घ ङ. | च छ ज झ ञ् |
| ट ठ ड ढ ण | त थ द ध न |
| प फ ब भ म | य र ल व श |
| ष स ह ळ क्ष ज्ञ | |

**२) नियम क्रमांक २ :**

शब्दाआधी चिन्हे वापरावीत. उदा. सात बाराचा उतारा व सात + बारा = एकोणीस यांचा क्रम असा असेल.

आधी - सात + बारा = एकोणीस
नंतर - सात बाराचा उतारा

**३) नियम क्रमांक ३ :**

चिन्हांचा क्रम असा असेल -

३.१) आधी, गणिती चिन्हे
३.२) नंतर विराम चिन्हे.

३.१) गणिती चिन्हांचा क्रम असा असेल -

| | | |
|---|---|---|
| ३.१.१ | - | वजा |
| ३.१.२ | + | अधिक |
| ३.१.३ | x | गुणिले (गुणाकार चिन्हे) |
| ३.१.४ | ÷ | भागिले (भागाकार चिन्हे) |
| ३.१.५ | = | बरोबर |
| ३.१.६ | > | च्या पेक्षा मोठा |
| ३.१.७ | < | च्या पेक्षा लहान |
| ३.१.८ | ( ) | गोल कंस |
| ३.१.९ | [ ] | चौकोनी कंस |
| ३.१.१० | { } | महिरपी कंस |
| ३.१.११ | % | टक्के |
| ३.१.१२ | * | तारका |

३.२) विरामचिन्हांचा क्रम पुढीलप्रमाणे असेल -

| | | |
|---|---|---|
| ३.२.१ | ; | अर्धविराम |
| ३.२.२ | , | स्वल्पविराम |
| ३.२.३ | . | पूर्ण विराम |
| ३.२.४ | : | विसर्ग |
| ३.२.५ | ! | उद्गारवाचक चिन्ह |
| ३.२.६ | ? | प्रश्नचिन्ह |
| ३.२.७ | - | अपस्सरण चिन्ह |
| ३.२.८ | ... | तीन टिंबे |
| ३.२.९ | ऽ | एक अवग्रह चिन्हे |
| ३.२.१० | ऽऽ | दोन अवग्रह चिन्हे |
| ३.२.११ | ऽऽऽ | तीन अवग्रह चिन्हे |
| ३.२.१२ | ‘ ’ | अवतरण चिन्ह |
| ३.२.१३ | “ ” | जोड अवतरण |
| ३.२.१४ | ० | अंश |

**४) नियम क्रमांक ४ :**

आद्याक्षरे दर्शविताना कधी (•) व कधी (०) असे लिहितात. अशावेळी • (पूर्णविराम) हे चिन्ह आधी व ० (पोकळ पूर्णविराम) हे चिन्ह नंतर घ्यावे. उदा -

आधी, पु. भा. भावे
नंतर, पु० ल० देशपांडे

**५) नियम क्रमांक ५ :**

अंकांचे स्थान आधी असावे.

अंक असल्यास त्याचे स्थान सुरुवातीस घ्यावे. अंक संपल्यानंतर प्रथम जे अक्षर असेल त्या गटात घ्यावे. नुसतेच अंक असतील तर ‘अ’ गटांच्या आधी घ्यावेत.

**६) नियम क्रमांक ६ :**

अर्धे व्यंजन आधी घ्यावे. उदा.

आधी, स्वये नंतर, सवय

**७) नियम क्रमांक ७ :**

आधी अर्धे व्यंजन नंतर पूर्ण अक्षर घ्यावे. उदा -

आधी, चक्का नंतर, चकाट्या

तसेच -

आधी, क्रम नंतर, कर्म

**८) नियम क्रमांक ८ :**

जागा मोकळी असलेला शब्द सलग शब्दाआधी घ्यावा. उदा -

आधी, नल गे आधी, का व्यासंगे
नंतर, नलगे नंतर, काव्यसंगे

**९) नियम क्रमांक ९ :**

जागा मोकळी असलेला शब्द जोडशब्दानंतर घ्यावा. उदा -

आधी, व्यथार्थ नंतर, व यथार्थ

**१०) नियम क्रमांक १० :**

दोन अर्धी व्यंजने असलेला शब्द एक अर्धे व्यजंन असलेल्या शब्दाच्या आधी घ्यावा. उदा -

आधी, उत्स्फूर्त नंतर, उद्रेक

**११) नियम क्रमांक ११ :**

अनुस्वाराची जागा स्वरांच्या बाबतीत त्या त्या स्वरानंतर लगेच असावे. उदा -

| | | | |
|---|---|---|---|
| अ | अक्ष | - | अंत |
| आ | आणि | - | आंतरपाट |
| इ | इस्त्री | - | इंद्र |
| उ | उत्तर | - | उंबरा |
| ए | एडका | - | एंद्रिय |
| ओ | ओज | - | ओंजळ |
| औ | औत | - | औध |

प्रत्येक स्वर हा 'अ' च्या बाराखडीत असला तरी स्वतंत्र आहे. स्वर बदलला की त्याचे स्वरूपही बदलते. या प्रत्येक स्वराचा 'अ' या स्वराशी संधी होतो. असे अनुस्वारित शब्द मुख्य स्वराजवळ घेतल्यास स्मरणसुलभ होतात. म्हणून 'अ' ने सुरु होणार व संधी होणार शब्द त्या त्या स्वरानंतर घ्यावेत.

**१२) नियम क्रमांक १२ :**

अनुस्वार व विसर्ग ह 'औ' नंतरचे स्वर असले तरी व्यंजनाशी स्वराची संधी होताना ते त्या स्वराला जोडून येतात. ते कधीही स्वतंत्रपणे येत नाहीत. म्हणून त्यांचे स्थान त्या त्या स्वरानंतर लगेच असावे. उदा:-

निवारा कसा निंदा कंठ
नि:स्पृह क:पदार्थ

**१३) नियम क्रमांक १३ :**

अनुस्वराचे स्वरूप जरी सारखे असले तरी त्यांचे उच्चार भिन्न असतात. म्हणून त्यांचे लेखन स्वरूपानुसार करावे उदा:-

अंबर, अंक व अंतर हे तिन्ही शब्द 'अ' कारी असले तरी त्यांचे उच्चार अम्बर, अङ्क व अन्तर असे आहेत. मात्र ते लक्षात न घेता व्यंजनाच्या क्रमाप्रमाणे लिहावेत. अंक ⟶ अंतर ⟶ अंबर.

**१४) नियम क्रमांक १४ :**

काही वेळा एखाद शब्द अनुस्वार देऊन लिहितात

दर्शवितात. अशावेळी खालील प्रमाणे त्यांची रचना करावी. उदा:-

आधी, हिन्दी नंतर, हिंदमाता

**१५) नियम क्रमांक १५ :**

सिंह या शब्दाचा उच्चार 'सिव्ह' असा करतात किंवा ज्ञान या शब्दाचा उच्चार 'न्यान' असा करतात किंवा वाङ्मय या शब्दाचा उच्चार 'वांग्मय'असा करतात. मात्र तरीही त्यांची नोंद स्वरूपानुसार योग्य स्थानी करावी. उदा -

सिव्हिल या शब्दानंतर सिव्हिण या शब्दाची नोंद न करता सिंचन या शब्दानंतर सिंहिण या शब्दाची नोंद करावी.

वाग्देवता - वांग्मय असे न लिहिता वाघरु - वाङ्मय अशी नोंद करावी.

**१६) नियम क्रमांक १६ :**

एकारांत शब्द हे 'अंकारात'लिहितात. ते अकारांत समजून अकारांत शब्दानंतर व अंकारांत शब्दांच्या आधी लिहावेत. उदा -

हाव ⟶ हवं ⟶ मोहवंती
तर ⟶ उत्तरं ⟶ तरंग

**१७) नियम क्रमांक १७ :**

क्ष व ज्ञ यांच्याप्रमाणेच द्य, श्र व त्र ही विशेष चिन्हे स्वतंत्र व्यंजनांप्रमाणे चालवावी. 'द्य' चे स्थान 'द' च्या आधी 'श्र' चे स्थान 'श' च्या आधी व 'त्र' चे स्थान 'त' च्या आधी असावे. मात्र, त्रुटी व तृण यात त्रु व तृ यांचा उच्चार समान असला तरी स्वरुपाप्रमाणे त्रुटी शब्द 'त्र' च्या गटात व तृण शब्द 'त' च्या गटात सामावला जाईल.

**१८) नियम क्रमांक १८ :**

ॐ हे चिन्ह असेल तर ते 'अ' या स्वराच्या आधी घ्यावे. 'ओम्' असे स्वरुप असेल तर 'ओभौ' शब्दाच्या नंतर घ्यावे.

**१९) नियम क्रमांक १९ :**

'अॅ' व 'या' यांचा उच्चार बऱ्याचदा सारखाच भासतो. तरी त्यांचे स्वरूप वेगळे असल्याने त्यांच्यापासून सुरु होणारे अथवा त्यांच्यात अंतर्भूत असलेले शब्द वेगवेगळ्या स्थानी लिहिले जातील, उदा:-

बट ⟶ बंडल ⟶ बॅट ⟶ ब्याद ⟶ बाद

**२०) नियम क्रमांक २० :**

शीर्षकात आधी अक्षरे व नंतर अंक असतील तर ती त्या त्या अक्षरांप्रमाणे सुरुवातीला येतील. मागे अक्षर,मध्ये अंक व पुढे अक्षर अशा शीर्षकातील पुढच्या अक्षराचा वेगळा विचार केला जाणार नाही.

याचाच अर्थ असा की, प्रत्येक स्वर किंवा व्यंजनाच्या आधी अंक व ते व्यंजन व अंक असलेले शीर्षक व त्यानंतर मूळ स्वर अथवा व्यंजन असा क्रम असेल. उदा -

| | |
|---|---|
| १०१ कारस्थाने | ५०१ कथा |
| कैंदी क्रमांक ७ | कहाणी १८५७ ची |
| कथा अकलेच्या कांद्याची | |

## विभाग तीन : उदाहरणे

प्रस्तुत नियमावलीनुसार शीर्षकांची रचना कशी करता येईल. याचे प्रात्याक्षिक उदाहरणे घेऊन येथे केले आहे. यातील काही उदाहरणे काल्पनिक आहेत.

| | |
|---|---|
| १) १ + १ = ११ | २) ॐ गं गणपतये नम: |
| ३) ॐ नम: शिवाय | ४) ॐ नमोजी आद्या |
| ५) अपराध मीच केला | ६) अध:पतन |
| ७) अंत | ८) अॅक्ट नंबर इलेव्हन |

९) ... आणि माणूस जागा झाला
१०) आपलं बुवा असं आहे.
११) आनंदाचे डोही आनंदतरंग
१२) आंतरिक उर्मी
१३) [इश्काचा रोग सोडून] तमाम रोगांवर अक्सिर इलाज
१४) इश्काचा रोग
१५) उजाडलं! पण सूर्य कुठे आहे?
१६) उजाडलं की काय ?
१७) उत्तरक्रिया
१८) उतर लवकर खाली
१९) उंबराचे फूल
२०) ऊन आणि पाऊस
२१) ऋतू हिरवा
२२) ऋषीपंचमी
२३) एक शून्य बाजीराव
२४) ऐट दोन घटकेची
२५) ओमकाराचे मूळ स्वरुप
२६) ओनामा स्वराज्याचा
२७) ओंजळ स्मृतिसमनांची
२८) औट घटकेचा राजा
२९) औंध संस्थानांच्या आठवणी
३०) क्रमवारिता
३१) क्रूरकर्मा
३२) कमला
३३) कंठ येतो दाटून
३४) क:पदार्थ हे जीवन
३५) कॅरम शिका
३६) काय द्याचं बोला
३७) कायद्याचं बोला
३८) कॉलसेंटर
३९) किस्सा खुर्चीचा
४०) कीरातार्जुन युध्द
४१) कुठे कुठे शोधू तिला?
४२) कुर्‍यात चालते नार
४३) कुर्यात सदा मंगलम् !
४४) कूपनलिका - एक वरदान
४५) कृषिवलाची हाक ऐकोनी
४६) क्लृप्ती यशाची
४७) केवळ पैशासाठी
४८) कैलास पर्वतावरील यती
४९) कैलासाची लेणे
५०) कोण होतास तू...
५१) कौटिल्यीय अर्थशास्त्र
५२) क्रौंचवध
५३) कौंतेय
५४) 'खडका'वरील नक्षी.
५५) खडकावरील अंकूर
५६) खंडित (?) स्वराज्य
५७) खंडित - अखंडित
५८) खाण तशी माती
५९) खिडकी
६०) खिंडीतले शौर्य
६१) खीर व पोळी
६२) खुमासदार अत्रे
६३) १०१ गोड गोष्टी
६४) गड आला, पण-
६५) गण गण गणात बोते
६६) ग्रंथालय संघटन
६७) गंमत जंमत
६८) गीता सार
६९) गुळ खोबरे
७०) गृह कलह
७१) ग्रे लिटरेचर
७२) गेस्ट हाऊस
७३) गोर्‍यांचा देशात
७४) गौरीहरपूजन
७५) घर दोघांचे
७६) घंगाळे
७७) घार हिंडते आकाशी
७८) घुमजाव
७९) घृणा
८०) ५०१ चुटके
८१) १८५७ चे स्वातंत्र्यसमर
८२) २००१ चविष्ट पदार्थ
८३) चवदार तळ्यांचा इतिहास
८४) चंद्र आहे साक्षीला
८५) चार ÷ दोन = एक प्रश्नचिन्ह?
८६) चार वाजता
८७) चैत्रबन
८८) छत्री व गौरांगी ललना
८९) छंद आणि छांदिष्ट
९०) छान! चालू द्या असंच!
९१) छानच आहे गाव
९२) (जसे) कराल तसे भराल
९३) जग काय म्हणेल?
९४) जंगलचा कायदा
९५) झगझगीत प्रकाश
९६) झंपरचंद्रिका
९७) झुबकेदार गौंडा
९८) झुंज
९९) टवाळा आवडे विनोद
१००) टंकलेखन मार्गदर्शिका
१०१) टेकाडे भाऊजी
१०२) टेंबे गुरुजी
१०३) ठसे जंगलाच्या राजाचे
१०४) ठाऊक आहे का तुज काही?
१०५) ठिगळ
१०६) डफावरची थाप
१०७) डंख
१०८) डौल
१०९) डॉम्बिस
११०) ड्रामा ऑफ लव्ह
१११) ड्रॉपर कसा वापरावा?
११२) डॉक्टर, तुम्हीसुद्धा?
११३) डॉक्टर लागू
११४) ढगाला लागली कळ
११५) ढंग न्यारा तुझा
११६) त्र्यंबकेश्वराचे महात्म्य
११७) त्रस्त जनांचा तळतळाट
११८) त्रटिका
११९) त्रिकोणाचा चौथा कोन
१२०) त्रिंचनापल्लीची वल्ली
१२१) त्रुटी
१२२) त्रेधातिरपिट
१२३) त्रैमासिक
१२४) तुका म्हणे आता
१२५) तृणांकूर
१२६) थापाड्या
१२७) थांब लक्ष्मी, कुंकू लावते!
१२८) थुई थुई नाच माझ्या अंगणात मोरा
१२९) थुंकू नये
१३०) थू: तुझ्या जीवनाला
१३१) थेरड्याची करामत
१३२) द्यावा आशिर्वाद आता
१३३) द्युत खेळे युधिष्ठिर
१३४) दसरा सण मोठा
१३५) दंभ आणि मत्स
१३६) दाम करी काम
१३७) द्रुम कल्पाचा
१३८) दु:खी आरसा
१३९) धनुर्धर राम
१४०) धनुर्वात
१४१) धनुष्य बाण
१४२) नटसम्राट
१४३) नंदादीप
१४४) नुरली आशा, नुरली इच्छा
१४५) नृत्यकला शिका
१४६) १०१ पाकक्रिया
१४७) २५० पदार्थ न्याहारीचे

नम्रता संपली की माणुसकी संपली असे समजावे.

१४८) पदवी परीक्षेचा गुंता १४९) पंढीनाथा, झडकरी आता...
१५०) पाच पांडवांची पत्नी १५१) पाचपेच
१५२) पु.ह.कुलकर्णी १५३) पु० ल० देशपांडे
१५४) प्रौढ प्रताप धुरंधर १५५) पौषाचा महिना
१५६) फटका व फराळ १५७) फंटूश
१५८) फॅण्टमच्या गोष्टी १५९) फार फार वर्षापूर्वी...
१६०) फ्रॉम लंडन १६१) फ्रेम तसबिरीची
१६२) फेरबदल १६३) बने, हे पहा मांजर
१६४) ब्रीद लोकसेवेचे १६५) 'बी' यांच्या कविता
१६६) बीजगणित १६७) २०२० भारत : एक महासत्ता
१६८) भर उन्हात १६९) भंबेरी
१७०) भ्रांत उद्याची १७१) भातुकली
१७२) मनमोहक मेंदी १७३) मंदारमाला
१७४) माझं काय चुकलं? १७५) माझे कार्य देवाचे कार्य
१७६) मुख्य गोष्ट म्हणजे... १७७) मृत्युंजय
१७८) मृत्युची हूल १७९) यदायदाहि धर्मस्य...
१८०) यंत्रमानव १८१) यःकश्चित्‌...
१८२) या, घर आपलंच आहे १८३) ऱ्हस्वदीर्घ
१८४) ऱ्हास रोमन साम्राज्याचा १८५) रमलखुणा
१८६) रंगात रंगला श्रीरंग १८७) राज शिवछत्रपती
१८८) लहानपण देगा देवा १८९) लंपास केली कंपासपेटी
१९०) १०१ विनोद १९१) वग माझा स्वातंत्र्याचा
१९२) वग हा प्रीतीचा १९३) वगळाल जरी आम्हा ....
१९४) वयनीची माया १९५) वयं का लपवावीत?
१९६) वयं मोठं खोटम्‌ १९७) वंगण
१९८) श्रवणभक्ती १९९) श्रावणात घननीळा
२००) श्रीमंताची लेक २०१) श्रोते हो!
२०२) शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ २०३) शंभर कौरवांचा पिता
२०४) शांतता! कोर्ट चालू आहे २०५) शांतेचं कार्ट चालू आहे
२०६) षटकोन २०७) षडानन
२०८) षोक २०९) ''सौ'' गत
२१०) स्वामी २११) सदासर्वदा
२१२) संपत शनिवाराची कहाणी २१३) सिंहनाद
२१४) सौदागर २१५) हृदयसंवाद
२१६) क्षमयाचना २१७) क्षात्रधर्म
२१८) क्षेपणास्त्र २१९) क्षोभ
२२०) ज्ञानदेवे रचिला पाया २२१) ज्ञानेश्वरी

ही संदर्भसूची नाही या लेखासाठी वापरलेल्या पुस्तकांची यादी आहे. 'केवळ नोंद' असे स्वरूप असल्याने सूचिशास्त्रानुसार तिची रचना नाही.

१) जोशी, लक्ष्मणशास्त्री (मराठी विश्वकोश)
२) जोशी, प्र. न. (दिनविशेष, आ. ३)
३) आपटे, मोहन, (शतक शोधांचे)
४) फाटक, शं. र., (भावना कोश : औषधशास्त्र)
५) दडकर, जया, (संक्षिप्त मराठी वाङ्मय कोश)
६) चित्राव, सिद्धेश्वर शास्त्री, (प्राचीन भारतीय स्थलकोश)
७) भालेराव, सुधाकर व कर्डिले, वसंत (सुगम विज्ञान कोश)
८) ठकार, वि. शं., (पर्याय - शब्दकोश)
९) कुलकर्णी, कृ. पां. (मराठी व्युत्पत्ती कोश)
१०) भडभडे, शरद शशिकांत (होमिओपाथिक औषधांचा भावनाकोश)
११) कामत, श्रीराम पांडुरंग, (विश्वचरित्र कोश)
१२) जोशी, श्रीपाद (उर्दू - मराठी शब्दकोश)
१३) जोशी, प्र. न. (आदर्श मराठी शब्दकोश)
१४) ओक, जनार्दन विनायक, (संस्कृत -मराठी शब्दकोश)
१५) पारखे, कामिल (महाराष्ट्र चरित्रकोश)
१६) शेवडे, श्री. वा. (भारतीय धर्मव्यवहार कोश)
१७) फडके, अरुण (मराठी लेखन कोश)
१८) दिवेकर, गुरुनाथ (मराठी - कन्नड शब्दकोश)
१९) जोशी, महादेव शास्त्री (भारतीय संस्कृती कोश)
२०) सोहोनी, शं. कृ. (शैक्षणिक टीपा कोश)

**प्रा. श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये**
डोंबिवली, (पूर्व)

●●●

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर (पूर्व प्राथमिक विभाग)


**खेळांचा प्रकल्प :**

अभ्यासाबरोबरच विविध खेळांचे महत्त्व विद्यार्थ्यांना माहीत व्हावे म्हणून डॉ. बेडेकर विद्यामंदिर, पूर्व प्राथमिक विभाग, विद्यालंकार सभागृहात 'खेळांचा प्रकल्प' या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रकल्पाचे उद्‌घाटन वि.प्र.मं.चे कोषाध्यक्ष श्री. मा. य. गोखले यांच्या हस्ते शुक्रवार दि. २८ नोव्हें. २००८ रोजी करण्यात आले. यावेळी पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. विदुला वैद्य, वि.प्र.मं.चे कार्यवाह श्री. उत्तम जोशी, सौ. सुमेधा बेडेकर, मंडळाच्या सभासद सौ. अल्पना बापट, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. विजया भंडारे, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. उषा कळमकर, सेवानिवृत्त शिक्षक तथा पत्रकार श्री. प्र. ग. वैद्य, सौ. आशा मंडपे, शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रदर्शनात विस्मृतीत गेलेले सागरगोटे, बिट्या, कवड्या, भातुकली, गंजिफा, सारीपाट, रुपणी, गाडा इ. विविध असे खेळांचे ४६ प्रकार मांडण्यात आले होते.



**सारीपाट आणि गंजिफा**



**भातुकलीचा खेळ**

पण गेल्या काही वर्षात रेडिओ, ट्रांझिस्टर बरोबर टी. व्ही., व्हिडीओ, चित्रपट या मनोरंजनाच्या प्रकारचे जाळे चांगलेच वाढले आहे. शाळा सुटली की मुले थेट टी. व्ही. व संगणकासमोरच बसतात. त्यामुळे खेळाचे प्रमाण कमी झाले आहे. मुले एकलकोंडी होतात. खिलाडूवृत्तीचा अभाव त्यांच्यात दिसून येतो. त्यांच्यातील सहनशीलता कमी होते.

लहानमोठे खेळ खेळल्याने शरीराबरोबर मनाचेही आरोग्य वाढते. व्यक्तीला अनुभव संपन्नता येते. व्यक्तीच्या मानसिक व सामाजिक विकासाला खेळ मदत करतात. खेळल्याने सांघिक वृत्ती वाढते. खेळांतून समाज प्रियतेची प्रेरणा मिळते. खेळाडूंचा बौद्धिक, मानसिक व स्मरणशक्तीचा विकास होतो. दैनंदिन जीवनातील क्लिष्टता, नीरसपणा व निरुत्साह खेळामुळे नाहीसा होतो.

पूर्वीच्या काळातील विस्मृतीत गेलेल्या खेळांचे महत्त्व मुलांना माहीत व्हावे, खेळांची भरभराट व्हावी, खेळांना उत्तेजन मिळावे, खेळ पद्धतशीरपणे खेळले जावेत हाच प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे.

**वृत्तलेखन - सौ. विदुला वैद्य**, मुख्याध्यापिका
डॉ. बेडेकर विद्या मंदिर, पूर्व प्राथमिक विभाग, ठाणे

जुगार हा लोभाचे अपत्य तर दुष्कृत्याचा जनक होय.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर (माध्यमिक विभाग)

**बाह्यस्पर्धा :**

✦ 'संस्कृती कलादर्पण' तर्फे चित्रकला व हस्ताक्षर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांचे निकाल पुढीलप्रमाणे -

**चित्रकला स्पर्धा :**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | - | मृण्मयी कोळी | (९ अ) |
| द्वितीय क्रमांक | - | ऋचा कानोलकर | (५ ब) |
| उत्तेजनार्थ | - | अभिषेक ठाकूर | (५ ब) |
| | | अथर्व लेले | (५ ब) |
| | | नम्रता शर्मा | (९ अ) |
| | | ममता येरूणकर | (१० ब) |

**हस्ताक्षर स्पर्धा :**

| | | | |
|---|---|---|---|
| द्वितीय क्रमांक | - | अक्षया पाटील | (६ ब) |
| | | समिक्षा पाटील | ( ) |
| | | श्रद्धा चौहान | (१० ब) |
| | | मृण्मयी कोळी | (९ अ) |

✦ 'व्यास क्रिएशन्स व स्वदेशी मेळा ०८' यांच्या संयुक्त विदयमाने चित्रकला व नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पारितोषिक पात्र विद्यार्थी पुढीलप्रमाणे -

**चित्रकला :**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | - | प्रसाद तिरोडकर | (१० अ) |
| द्वितीय क्रमांक | - | मृण्मयी कोळी | (९ अ) |

**नृत्य :**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | - | निधी प्रभू | (९ क) |

✦ 'हुतात्मा दिना' निमित्त जिज्ञासा ट्रस्ट ठाणे यांचेतर्फे घोषवाक्य स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत **ओमकार सावंत (८ अ), स्नेहल भोळे (८ अ)** यांना पारितोषिक प्राप्त झाले.

✦ **जलतरण :**

५० मी. व १०० मी. बटरफ्लाय विभागीय जलतरण स्पर्धेमध्ये कुणाल मोहिते (८ ब) यास प्रथम क्रमांक तर २०० मी. बटरफ्लाय मध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. तसेच त्याची राज्यस्तरावर निवडही झाली.

✦ **गायन स्पर्धा :**

रोटरॅक्ट क्लब ऑफ ठाणे टाऊन यांचे तर्फे 'सूर ०८' या वैयक्तिक आंतरशालेय गायन स्पर्धेत इ. ७ अ मधील प्रेम चिंदरकर याने पाश्चात्य गीत सादर केले.

✦ शिवोहं इन्फोटेक तर्फे झालेल्या आंतरशालेय चित्रकला स्पर्धेत प्रणिता काळभोर हिला उत्तेजनार्थ पारितोषिक म्हणून प्रमाणपत्र व सानेगुरूजींची सीडी मिळाली.

✦ कै. श्री. बाळू बाक्रे संगीत स्पर्धेत तबला व हार्मोनिअम वादनात विद्यार्थी सहभागी झाले.

✦ कराटे बुडोकॉन इंटरनॅशनल वर्ल्ड चॅम्पियनशीप २००८ या आंतरशालेय स्पर्धेत काथाज मध्ये अंकिता दुधे (६ ब) हीस ब्रॉंझपदक तर कुमिथेजमध्ये सुवर्णपदक प्राप्त झाले.

✦ **२० सप्टे. रोजी घेण्यात आलेल्या 'डॉ. होमी भाभा लेखी परीक्षे'चा निकाल पुढीलप्रमाणे -**

इ. ६ वी : ४१ विद्यार्थ्यांपैकी १० विद्यार्थ्यांची प्रयोग-परीक्षेसाठी निवड झाली. ३१ विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रासाठी निवड झाली.

इ. ९ वी : १६ विद्यार्थ्यांपैकी ३ विद्यार्थ्यांची प्रयोग परीक्षेसाठी निवड झाली. ४ विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रासाठी निवड झाली.

✦ **प्रकल्प निवड :**

राष्ट्रीय बालविज्ञान परिषद २००८ अंतर्गत 'विष्णुनगर व संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरातील कीटकांचा अभ्यास' या विषयाच्या प्रकल्पाची निवड राज्यपातळीवर झाली.

✦ इ. ९ वी अ च्या विद्यार्थ्यांनी नौपाडा पोलिस स्टेशनला भेट देऊन वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री. भालचंद्र कुलकर्णी यांच्याकडून पोलिस स्टेशनचे कामकाज कशा पद्धतीने चालते हे समजावून घेतले तसेच ३०३ व ४१० या रायफल्स, पिस्तुल, अश्रुधुराचे नळकांडे यांचा वापर कसा व केव्हा केला जातो याची माहितीही घेतली.

✦ **बालदिन :**

'बालदिनाचे' औचित्य साधून शाळेचे माजी विद्यार्थी डॉ. सुमित बोडखे, डॉ. पुष्कर शेजवलकर, डॉ. नीलजा राणे, डॉ. सुप्रिया पाटील, डॉ. शिल्पा लागू, डॉ. दीपाली खेडकर यांनी इ. ५ वी ते १० च्या सर्व विद्यार्थ्यांची दंतचिकित्सा केली.

✦ **चित्रपट :**

२२ नोव्हे. व २५ नोव्हे. रोजी इ. ५ वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'श्यामची आई' हा चित्रपट दाखवण्यात आला. तर विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जागृती निर्माण व्हावी म्हणून 'मुंबई चिल्ड्रन्स फिल्स' ने 'आपले मित्र - प्राणी व पक्षी' हा चित्रपट इ. ६,७,८ वी च्या विद्यार्थ्यांना दाखवला.

✦ **कार्यशाळा :**

कॅमलिन इंडिया लि. कंपनीतर्फे 'फेब्रिक पेन्टींग' ची विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा २९ नोव्हे. रोजी शाळेत घेण्यात आली.

२९ नोव्हे. रोजी ए.के. जोशी स्कूल येथे झालेल्या गणित विषयाच्या कार्यशाळेस सौ. धोत्रे, श्री. शेलवले उपस्थित होते.

✦ १, २ व ३ डिसे. रोजी झालेल्या क्रीडामहोत्सवात इ. ५ वी, ६ वी साठी लंगडी, इ. ७ वी ते १० वी साठी खोखो व कबड्डी हे खेळ घेतले गेले या निमित्ताने स्काऊट गाईडच्या विद्यार्थ्यांनी 'आनंदमेळाव्या'चे आयोजन केले यात वडापाव, टाइमपास यासारखे पदार्थांची विक्री विद्यार्थ्यांनी केली.

✦ **जिम्नॅस्टिक :**

डोंबिवली येथे झालेल्या 'राज्यस्तरीय फेडरेशन जिम्नॅस्टिक स्पर्धेत' प्रिती टिपाले (६ अ) ही विजयी होवून सब ज्युनिअर गटात त्रिवेंद्रम येथे होणाऱ्या नॅशनल जिम्नॅस्टिक स्पर्धेसाठी तिची निवड झाली.

## सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा (मा. वि.)

२००८ - २००९ ह्या वर्षात Directorate Of Sports म्हणजेच SGF महाराष्ट्र राज्य यांनी आयोजित केलेल्या विविध क्रीडा स्पर्धांमध्ये आमच्या शाळेने भाग घेतला.

**Aquatics:**

कळवा तरण तलाव येथे आयोजित केलेल्या १४ वर्षाखालील मुलांची जिल्हास्तरीय अंतरशालेय स्पर्धा.

**बॅडमिंटन :**

१४ आणि १७ वर्षाखालील मुले आणि मुलींच्या संघाने जिल्हास्तरीय स्पर्धेत भाग घेतला आणि उपांत्य फेरीत पोहचले. रोमित टकले याची मुंबई विभागीय साठी निवड झाली.

**बास्केट बॉल :**

१४ आणि १७ वर्षाखालील मुलांचा संघ

जिल्हास्तरीय स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पोहचला.

**बुद्धिबळ :**

१४ वर्षाखालील मुलांनी आणि १७ वर्षाखालील मुलींनी वर्तक नगर, ठाणे येथे झालेल्या तालुका स्तरीय स्पर्धेत भाग घेतला.

**क्रिकेट :**

१४ आणि १६ वर्षाखालील मुलांचा संघ तालुकास्तरावर खेळला आणि दोन सामने जिंकले.

**कराटे :**

इ. १० वीला चिराग मालवडकर यांस जिल्हास्तरीय स्पर्धेत सुवर्णपदक मिळाले. मानसी पोटफोडे आणि चिन्मय पोटे यांना रजतपदक तर हर्षल पोतनीस यांस कांस्यपदक मिळाले.

**फुटबॉल :**

१६ वर्षाखालील मुलांच्या संघाने अंबरनाथ येथे, तर १७ वर्षाखालील मुलांच्या संघाने केशवसृष्टी भाईंदर येथे झालेल्या स्पर्धांमध्ये भाग घेतला.

**ज्युडो :**

१४ वर्षाखालील मुलींनी जिल्हास्तरीय स्पर्धेत भाग घेतला.

**लॉन टेनिस :**

१४ वर्षाखालील मुली आणि १७ वर्षाखालील मुलांनी ऑफिसर्स क्लब ठाणे येथे झालेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेत भाग घेतला.

**टेबल टेनिस :**

१४ आणि १६ वर्षाखालील मुले आणि मुलींचा संघ जिल्हास्तरीय स्पर्धेत खेळला आणि उपांत्य फेरीत पोहचला. १६ वर्षाखालील मुलींचा संघ जिल्हास्तरावर उपविजेता ठरला. वृषाली प्रसादे हिने राज्यस्तरावर आणि राष्ट्रीय स्तरावर भाग घेतला.

**स्केटिंग :**

इ. ५ वी तील अद्वैत भट याने रोड स्केटिंग रेस आणि रिंग स्केटिंग मध्ये भाग घेतला.

**जिमनॅस्टिक :**

इ. ५ वी तील वैष्णवी गेज्जी मुंबईला झालेल्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

**मॅरेथॉन :**

जवळ जवळ १०० विद्यार्थ्यांनी वर्षा मॅरेथॉन आणि महापौर मॅरोथॉन स्पर्धेत भाग घेतला.

✦ मुलुंड येथे झालेल्या वझे बुद्धिबळ स्पर्धेत आमच्या शाळेला द्वितीय क्रमांक मिळाला.

✦ जागृती गणेश मंडळ, सह्योग मंदिर आयोजित सायकल रेस मध्ये इ. ८ वी तील कौस्तुभ दामले यांस द्वितीय पारितोषिक मिळाले.

✦ इ. १० वी तील रोमित टकले याने थायलंड येथे झालेल्या बॅडमिंटन स्पर्धेत भाग घेतला. तो राज्यस्तरीय खेळाडू आहे.

✦ MCA (मुंबई क्रिकेट असोसिएशन) आयोजित क्रिकेट स्पर्धेत आमच्या शाळेच्या संघाने ३ सामने जिंकले. पहिला सामना न्यू इंग्लिश स्कूल कळवा यांच्या बरोबर होता ज्यात विराज दिवेकर याने वैयक्तिक शतक झळकवले. दुसरा सामना सेंट जॉन स्कूल बरोबर होता ज्यात गंधार सूर्यवंशी याने ९४ धावा काढून ५ गडी बाद केले. त्याला सामनावीर घोषित करण्यात आल. ओसवाल स्कूल बरोबर झालेला तिसरा सामना आमच्या शाळेने जिंकला आणि उपांत्य

फेरीत आपली जागा निश्चित केली. विराज दिवेकर याने ५८ धावा केल्या आणि लौकिक कोतवडेकर याने तीन गडी बाद केले.

मुंबई क्रिकेट असोसिएशने आयोजित केलेली १६ वर्षाखालील विद्यार्थ्यांची क्रिकेट स्पर्धा आमच्या शाळेने जिंकली. शाळेने नाणेफेक जिंकून फलंदाजी पत्करली व ४५ षटकात ३६० धावा केल्या.

**फलंदाजी : खालील विद्यार्थ्यांनी केलेल्या धावा:**

| | | |
|---|---|---|
| कु. विराज दिवेकर | - | ११७ धावा |
| कु. गंधार सूर्यवंशी | - | ८५ धावा |
| कु. गंधार बेडेकर | - | ४९ धावा |
| कु. केयूर छेडा | - | ४९ धावा |

न्यू इंग्लिश स्कूल, कळवा यांचा पूर्ण संघ ३६ धावांत गारद झाला व ३२४ धावांनी आमच्या शाळेनी ही स्पर्धा जिंकली.

**गोलंदाजी : प्रभावी गोलंदाजी केलेले विद्यार्थी :**

| | | |
|---|---|---|
| कु. केयूर छेडा | - | ४ बळी |
| कु. सुबोध मांजरेकर | - | ३ बळी |

**राष्ट्रीय बालविज्ञान परिषदेकडून प्रकल्पाची निवड:**

या आमच्या 'Energy Implication of Waste Management' प्रकल्पाची राष्ट्रीय बालविज्ञान परिषदेने घेतलेल्या स्पर्धेच्या प्रादेशिक स्तरावर निवड झाली. सिद्धी सुर्वे (गट प्रमुख), दिशा सत्रा, अर्ची गाला, रिद्धी छेडा, ऐश्वर्या दळवी. हे यातील सहभागी विद्यार्थी होते.

**राष्ट्रीय बालविज्ञान परिषदेकडून प्रकल्पाची निवड:**

जिज्ञासा ट्रस्ट - राष्ट्रीय बाल विज्ञान परिषदेने आयोजित केलेल्या विभागीय स्तरावरील स्पर्धेत आमच्या शाळेने भाग घेतला. त्यातून आमचा प्रकल्प 'Reuse of Waste paper - Solid Waste Management' (निरुपयोगी कागदाचा पुर्नवापर)ची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. सहभागी विद्यार्थी - सिद्धी सुर्वे (गट प्रमुख), दिशा सत्रा, आर्ची गाला, रिद्धी छेडा, ऐश्वर्या दळवी.

**आंतरशालेय कै. श्री. बाळू बाक्रे संगीत स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे :**

| | | |
|---|---|---|
| तबला | कु. रोहित देव | प्रथम पारितोषिक |
| हार्मोनियक | कु. मधुरा जोशी | प्रथम पारितोषिक |
| गायन | कु.मधुरा जोशी | प्रथम पारितोषिक |
| | कु. तन्मय सिन्नरकर | प्रथम पारितोषिक |

**डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा २००८-०९ चा निकाल :**

| | इ. ६ वी | इ. ९ वी |
|---|---|---|
| परीक्षेला बसलेले विद्यार्थी | ४७ | १९ |
| प्रात्यक्षिक परीक्षेसाठी पात्र विद्यार्थी | १२ | ८ |
| प्रमाणपत्र मिळवणारे विद्यार्थी | ३५ | ८ |

**Whacky Ideas Competitions, IIT, मुंबई :**

आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी वरील स्पर्धेत भाग घेतला आणि शाळेच्या एका प्रकल्पाची पुढील स्पर्धेसाठी निवड झाली.

प्रकल्पाचे नाव - Green School

सहभागी विद्यार्थी - अमित पाटणकर आणि कौस्तुभ चिपळूणकर.

IIT, मुंबई येथे २४ जानेवारी ते २६ जानेवारी २००९ ह्या कालावधीत होणाऱ्या टेकफेस्ट मध्ये वरील विद्यार्थी आपला प्रकल्प सादर करतील.

**राष्ट्रीय बालविज्ञान परिषदेकडून प्रकल्पाची निवड:**

आमच्या शाळेच्या विज्ञान प्रकल्पाची 'Reuse of

Waste paper - Solid Waste Management' (निरुपयोगी कागदाचा पुर्नवापर) राष्ट्रीय बालविज्ञान परिषदमध्ये राष्ट्रीयस्तरावर निवड झाली. सदर स्पर्धा कोहिमा नागालँड येथे २७ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २००८ या काळात होईल. सिद्धी सुर्वे (गट प्रमुख), दिशा सत्रा, आर्ची गाला, रिद्धी छेडा, ऐश्वर्या दळवी. हे सहभागी विद्यार्थी आहे.

## जोशी - बेडेकर महाविद्यालय

**दि. १० नोव्हेंबर ते १० डिसेंबर या कालावधीत संपन्न झालेले कार्यक्रम :**

✦ दि. १० नोव्हेंबर ते १९ नोव्हेंबर पर्यंत हिंदू सेवा संघ, मामणोली, कल्याण येथे महाविद्यालयाच्या N.S.S. Unit तर्फे शिबीर आयोजित करण्यात आले होते.

✦ दि. २० नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय चर्चासत्रपूर्व कार्यशाळा- 'स्वातन्त्र्योत्तर भारतीय साहित्य' या विषयावर आयोजित करण्यात आली होती. संस्कृत, मराठी, हिंदी व इंग्रजी या चार भाषांतील एकूण सोळा शोधनिबंधांचे या प्रसंगी वाचन झाले. विशेष म्हणजे महाविद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांनी शोधनिबंध सादर केले. डॉ. हरिश्चन्द्र थोरात, डॉ. मंजूषा गोखले, डॉ. राजम् नटराजन् पिल्ले व डॉ. सुधीर निकम यांची मान्यवर सत्राध्यक्ष म्हणून उपस्थिती होती.

✦ दि. २४ नोव्हेंबर रोजी 'टॅलेंट ॲकॅडमी' तर्फे मराठी एक - अंकी नाटक सादर करण्यात आले.

✦ दि. २६ नोव्हेंबर रोजी कनिष्ठ महाविद्यालयाच्या 'व्याससभा' अंतर्गत एका नवीन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संस्कृत विभागप्रमुख प्रा. मुग्धा कुलकर्णी यांनी प्राध्यापकांना संस्कृत संभाषणाची तोंडओळख करून दिली. त्यानंतर 'माझ्या आवडत्या कविता' या विषयावर चर्चा झाली.

✦ दि. २९ नोव्हेंबर रोजी जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या चित्रपट मंडळ व एशियन फिल्म फाउंडेशन याच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय चित्रपट रसास्वाद कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी 'बायिसकल थिव्हज्' हा चित्रपट दाखवण्यात आला. कार्यक्रमाला श्री. सुधीर नांदगावर, श्रीमती शब्दगंधा कुलकर्णी, श्री. अभिजित देशपांडे यांची उपस्थिती होती.

✦ दि. ३ डिसेंबर रोजी 'N.S.S. व Women's Development Cell' तर्फे स्त्रियांविरुद्धच्या अत्याचारांवर आधारित शाहीर संभाजी भगत यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

✦ दि. ४ डिसेंबर रोजी 'Scholar's Academy' तर्फे चार्ली चॅपलिन यांचा 'Modern Times' हा चित्रपट दर्शविण्यात आला व 'Economic Depression' या विषयावर चर्चा झाली.

✦ दि. ५ डिसेंबर रोजी वरिष्ठ महाविद्यालयाच्या 'व्याससभा' उपक्रमांतर्गत संस्कृत संभाषण वर्ग प्रा. मुग्धा कुलकर्णी यांनी आयोजित केला होता. प्रत्येक व्याससभेत संस्कृत संभाषण वर्ग आयोजित करून सर्व प्राध्यापकांना संस्कृत संभाषणात पारंगत करण्याचा प्राचार्या डॉ. सी. सिंह यांचा मानस आहे. तसेच प्रा. श्री. साबळे यांनी नवीन गुणपत्रिकेच्या संदर्भात माहिती सांगितली.

✦ दि. ५ डिसेंबर रोजी 'Talent Academy' तर्फे सुगम संगीत कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. श्री. श्रीकांत रानडे या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**वृत्त संकलन - प्रा. मुग्धा कुलकर्णी**
जोशी - बेडेकर महाविद्यालय

**विद्या प्रसारक मंडळाच्या ग्रंथालयाचे भ्रमणध्वनी संकेत स्थळ (Library Mobile Wesite) :**

आजच्या माहिती युगात उपलब्ध माहितीच्या साठ्यात सतत नवीन व अद्ययावत माहितीची भर पडत असते आणि अनेकांना सतत काहीना काही माहिती तातडीने हवी असते.

माहितीचा शोध या क्षेत्रात इंटरनेट हा परवलीचा शब्द आहे. बहुतेक लोकांकडे आज अत्याधुनिक सुविधा असलेले ES1 वगैरे श्रेणीतील मोबाईल फोन असतात. त्यामुळेच इंटरनेटचा मोबाईल तर्फे वापर हा PC तर्फे इंटरनेटच्या वापरापेक्षा सहज आणि सर्वत्र उपलब्ध होऊ शकतो. या मोबाईल तंत्रज्ञान किंवा नेटवर्क तंत्रज्ञानाच्या विकासामुळे आज अनेक संकेतस्थळे, Open Source Softwares अशा सोयी सुविधांचा उपयोग करून ग्रंथालयाची इ. सुविधा आणि सेवा (E. Library Sources & Sevices) ग्रंथालयाच्या ग्राहकांना त्याच्या मोबाईल फोन, PDA आणि इतर साधनांतर्फे उपलब्ध करून देणे आता शक्य झाले आहे आणि म्हणूनच विद्या प्रसारक मंडळाच्या या Library Mobile Website मुळे विद्यार्थी शिक्षक तसेच इतर अभ्यासकांना संस्थेच्या सर्व ग्रंथालयांतील उपलब्ध ग्रंथसंपदेचा तसेच माहितीचा शोध मोबाईल तर्फे अगदी ग्राहकांच्या खिशात उपलब्ध करून दिला आहे.

अशा प्रकारच्या नवनवीन प्रगत सेवा विद्यालय परिसरात सुरू करण्याची मूळ कल्पना डॉ. विजय बेडेकर यांची. डॉ. बेडेकर हे नेहमीच परदेशात अभ्यासक दौऱ्यासाठी जात असतात. आजपर्यंत त्यांनी जवळ जवळ ६० देशांतील ग्रंथालयांना भेटी दिल्या आहेत. त्यामुळे त्या ग्रंथलयातील सेवांबाबत सखोल निरीक्षण करून येथे तशा प्रकारच्या सेवा सुरू करण्याचा त्यांना नेहमीच प्रयत्न असतो.

ही सेवा उपलब्ध करून देणारे श्री. संदीप भावसार यांनी या Website बाबत अधिक माहिती देतांना सांगितले की ''आपली संस्था ही अशा प्रकारची सेवा देणारी भारतातील पहिली संस्था ठरली आहे.''

नोव्हें. २००८ मध्ये आम्ही या Library Mobile Website ची सुरुवात केली. या सेवेद्वारे आमच्या ग्रंथालयाचे सभासद / वाचक आमच्या ग्रंथालयाचा OPAC त्यांच्या मोबाईल वर पाहू शकतील. आणि ग्रंथसंपदेचा शोध घेऊ शकतील तसेच ग्रंथालयातील इतर माहिती आणि सेवा ही या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत जसे ग्रंथालयाचे तास, संपर्काचे पत्ते इत्यादी.

इंटरनेट सेवा उपलब्ध असणाऱ्या आधुनिक श्रेणीच्या मोबाईल उपकरणांवर आपल्याला ही मोबाईल वेबसाईट पाहण्यासाठी खालील संकेत स्थळावर Log on करावे. bttp://wapamama.net/drvnbrimslibrary

अशा प्रकारची प्रगत सेवा पुरवीण्यात जसे आपली संस्था अग्रगण्य ठरली आहे तसेच Eduserv Athens Account ही सेवा देखील संपूर्ण भारतात प्रथमच विद्या प्रसारक मंडळातर्फे पुरविण्यात येते. या सेवेतर्फे वाचकांना IPbase Online Database विद्यालय संकुला बाहेर देखील वापरता येतात.

या पूर्वी २००६ मध्ये BRIMS मध्ये E books in mobile ही सेवा सुरू केली त्यासाठी आम्ही MOBIPOCKET हे OpenSource Software वापरले होते.

**ग्रंथालया तर्फे उपलब्ध असलेल्या इतर इ -सुविधा व आधुनिक ग्रंथालय सेवा खालील प्रमाणे:**

Financial Times Newspaper (Online + Print)

***Online Datbases :***

CMIE Prowess Database (10000 + Indian Companies Data of Annual Accounts, Stock Exchanges and Company announcements)

Proquest Database (2500 + Business Mangement Journals + 13500 These and Dissertations)

***Jstor Database :***

Project Muse Database (300 + High Quality

Social Science Journals from 60 scholary publishers)

***Manupatra Database :***

Oxford Dictionary of National Biography

Dictionary of Scientific Biography

Stateman's Year Book

Given the Links of all Open Access National and International Databases link ERIC, OPEN-JGATE,DOAJ,

**Advance Library Services :**

1) Infopacks (Using Really Simple Syndication)

2) Online Chat (Gmail and Skype "drvnbrimslibrary" from 7 a.m. to 11 p.m.)

3) Database Search Service

4) Wifi Access

5) 22 Computers available for Internet and Database Access

6) Daily News Updation

7) Elibrary site - http://www/vpmthane.org/im/elib/main.htm

अधिक माहितीसाठी कृपया खालील भ्रमणध्वनी क्रमांकावर ग्रंथपाल संदीप भावसार यांच्याशी संपर्क साधावा. भ्रमणध्वनी क्रमांक : ९९८७०४९०९९

## बा. ना. बांदोडकर महाविद्यालय

**✦ जैवतंत्रज्ञान विभाग - प्रयोगशाळा उदघाटन वृत्त :**

आजच्या स्पर्धात्मक जगात शुद्ध विज्ञान शाखेचा विद्यार्थीवर्ग घटत आहे अशी ओरड चालू असताना तोच वर्ग आज व्यावहारीक विज्ञान शाखेला मोठ्या प्रमाणावर प्रवेश घेत आहे आणि हिच वाढीव विषयांची मागणी लक्षात घेऊन विद्या प्रसारक मंडळाच्या ठाणे येथील बा. ना बांदोडकर महाविद्यालयात वर्ष २००७ -२००८ पासून ''जैवतंत्रज्ञान'' हा विषय पदवी स्तरावर सुरू करण्यात आला. तसेच द्यावर्षी (२००८-२००९) सूक्ष्मजीवशास्त्र हा विषय देखील पदवी स्तरावर सुरू करण्यात आला.

त्या अनुषंगाने महाविद्यालयाच्या जैवतंत्रज्ञान प्रयोगशाळेचे उदघाटन दि. १७ सप्टेंबर रोजी डॉ. निलीमा जोशी ( उपाध्यक्ष, ग्लेनमार्क फार्मा लि.) यांच्या हस्ते झाले.

डॉ. निलीमा जोशी यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांना जैवतंत्रज्ञानाच्या सहाय्याने बनवलेली औषधे, त्यांची निर्मिती आणि उपयोग विषद केला. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना या क्षेत्रातील व्यवसायातून नवनवीन संधी दर्शविल्या. त्यांनी त्यावेळी या विषयावर आयोजित केलेल्या प्रश्नमंजुषेला विद्यार्थी वर्गाने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमाला विद्या प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. पेजावर व सर्व विद्यार्थी वर्ग उपस्थित होता.

डॉ. जोशी यांनी विद्यार्थ्यांना केलेल्या मौलिक मार्गदर्शनाबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पेजावर यांनी त्यांचे व सर्व उपस्थितांचे आभार मानले. हा विभाग सुरू करण्यासाठी प्राचार्या डॉ. पेजावर यांनी मार्गदर्शन केले.

✦ ठाणे सायबर काईम सेल व नॅसकॉम यांनी दि. १८ सप्टेंबर पासून चालू केलेल्या सायबर सेफ ठाणे मोहीमेअंतर्गत ठाण्यातील बा. ना. बांदोडकर महाविद्यालयात विद्यार्थ्यासाठी ''Latest Trends in Information Security and hacking techniques'' विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. श्री. रोहन पाटील, Vista Infosec Pvt. Ltd यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या वेळी व्याख्यानाला DCP श्री. देशमाने, ACP., श्री. जाधव तसेच Police Sub. Inspector उषा सूर्यवंशी उपस्थित होत्या. या प्रसंगी ACP जाधव यांनी सायबर वापरावयास सोपे परंतु गैरवापराचे धोके या बद्दल अधिक विद्यार्थ्यांना सांगितले.

बांदोडकर कॉलेजच्या प्रा. अभिजित काळे यांनी ठाणे सायबर काईम सेल व नॅसकॉम यांनी सुरू केलेल्या या मोहिमेकरता त्यांना धन्यवाद दिले. तसेच विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिल्याबद्दल आभार मानले. या कार्यक्रमाला बांदोडकर महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच शिक्षक व शिक्षकेतर सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच ठाणे व मुंबई परिसरातील इतर महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच शिक्षक उपस्थित होते.

## वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

**✦ Leadership या विषयावर डॉ. एस. डी. सिद्धन यांचे व्याख्यान :**

डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टीट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (BRIMS) तर्फे दि. १ नोव्हेंबर रोजी Leadership या विषयावर डॉ. एस. डी. सिद्धन यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

Leadership is not optional, its essential या वाक्याने सुरुवात करत नेतृत्व गुणाचे सध्याच्या स्पर्धेच्या युगातील महत्त्व त्यांनी सांगितले.

नेतृत्व गुण ही संज्ञा विशद करत नेतृत्व गुणाच्या विविध पैलू बाबत माहिती ही त्यांनी स्पष्ट करून सांगितली.

व्याख्यानाच्या पुढील भागात व्यवस्थपाक आणि पुढारी (Manager & Leader) यातील फरक स्पष्ट करतांना त्यांनी सांगितलेले पुढील वाक्य सर्वांचेच लक्ष वेधणारे ठरले. ते असे - ''Manager do things right, Leaders do right Things'' या वाक्यामुळे व्यवस्थापन आणि नेतृत्व यातील फरक समजणे अधिक सोपे गेले.

त्यानंतर यशस्वी पुढाऱ्याचे गुण (Qualities of successful Leader), नेतृत्व गुण या विषयाची व्याप्ती, या क्षेत्रातील नवीन संधी, दिशा इ. बद्दल त्यांनी माहिती सांगितली. संस्कृती, भाषा, धर्म यांची नेतृत्व या क्षेत्रातील भूमिका ही त्यांनी विशद करून सांगितली.

नेतृत्व याविषयाची तत्त्वे तसेच x,y,z सिद्धांत समजावून सांगताना त्यांनी वापरलेल्या म्हणी, सुविचार जसे ''Leadership cannot be taught but if can learnt'' किंवा ''It is never to late to be what you might have been''. इ. यामुळे हे व्याख्यान अधिकच चित्तवेधक ठरले. व्याख्यानाच्या शेवटी पियानोवादक बेंजामीन झांडर यांची चित्रफीत दाखविण्यातआली त्यामुळे शेवट अधिकच अल्हाददायी झाला.

**वृत्तलेखन - देविका शिंदे**
MMS - Sem - I

●●●

***'दिशा'***

वर्गणी रु. २५०/- वार्षिक
(वर्गणी कोणत्याही महिन्यात भरता येते)
वर्गणी रोख/धनादेशद्वारे/मनी ऑर्डरने भरता येईल.

***◈ वर्गणीचा पाठवण्याचा पत्ता ◈***

कार्यकारी संपादक, व्ही. पी. एम. दिशा,
विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर,
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.

मुखपृष्ठावरून

संपादकीय

आर्थिक मंदी व समाज

दुर्दैवाने भारतही याला अपवाद नाही. भारताची अर्थव्यवस्था ना भांडवली ना समाजवादी. तिचे नामकरण 'मिश्र अर्थ व्यवस्था' अशा गोंडस शब्दांत केले गेले. दोन चांगल्या बाबींचे मिश्रण चांगलेच असते, असा भाबडा आशावाद यात दिसतो. भारत हा प्राचीन, इतिहाससमृद्ध देश आहे. अमानुष इस्लामी आक्रमणांच्या काळापर्यंत भारतात सर्वच क्षेत्रांत सुवर्णयुग होते. या विकासाची कारणे अभ्यासणे मार्गदर्शक ठरेल. आजच्या पोथिनिष्ठ साम्यवादी किंवा भांडवलशाही आर्थिक रचनेवर हा विकास नक्कीच आधारलेला नव्हता. एकंदरीतच त्याची सामाजिक वीण ही परस्परावलंबी होती. व्यवसायांचे विभाजन होते. समाजातील सर्व गटांच्या नैसर्गिक क्षमतांचे उपयोजन करून घेण्यात आले होते. सर्व व्यक्ती या बौद्धिक वा शरीरिक क्षमातांबाबत समान नाहीत, हे वास्तव समाजरचनेत स्वीकारण्यात आले होते. व्यक्ती व समाजाच्या आर्थिक विकासापेक्षा चारित्र्य आणि नीती समृद्ध करण्याकडे जास्त कल होता. बालवयापासून पाप-पुण्य, नीती-अनिती इ. संकल्पनांच्या माध्यमातून हेतुपुरस्कर संस्कार केले जात. म्हणूनच व्यक्तीच्या किंवा समाजाच्या समृद्धीमध्ये आर्थिक क्षमतांपेक्षा सामाजिक मूल्ये महत्त्वाची होती. नात्यांचा आदर महत्त्वाचा होता.

आजचा भारतीय समाज हे समजावून घेण्यास तयार नाही. त्याच्या दृष्टीने आर्थिक समृद्धीचे फक्त दोन मार्ग आहेत, ते म्हणजे भांडवलवाद व साम्यवाद. दुर्दैवाने या सर्व सिद्धांतात माणूस हा मूळ माध्यम आहे, हेच विसरले जात आहे. मूळ विषयापेक्षा इतर बाबीच चर्चिल्या जात आहेत. सर्व माणसासाठीच केले जात असले, तरी त्याच्यां मूळ प्रकृतीचा विचार न करताच केले जात आहे. प्रत्येक माणूस षड्रिपुंनी ग्रस्त असतो. वय, संधी व परिस्थिती यांनुसार या षड्रिपुंचे संतुलन होणे आवश्यक असते. अशा संतुलित समाजनिर्मितीची धारणा हा भारतीयांचा धर्म आहे.

पैसा मिळाला की माणूस समृद्ध होतो ही संकल्पना भारतात नव्हती. उलट आर्थिक गरिबी असणाऱ्या माणसालाही सुसंस्कारित करण्याचा प्रयत्न केला गेला. आजच्या मंदीचे खरे कारण फसवणूक, स्वार्थ व अप्पलपोटेपणात आहे. अमेरिकन पतसंस्थांची मनमानी त्यास जबाबदार आहे. त्याची फळे ते भोगत आहेत.

यांतून जो धडा घ्यायचा तो महत्त्वाचा आहे. तो धडा समृद्धी म्हणजे काय हे समजावून घेण्याचा. भारताची आजची आर्थिक परिस्थिती कशीही असली, तरी समाज भ्रष्टाचार, जातीय सवलतींच्या छत्रीखाली धटिंगणांनी केलेल्या राजकीय खेळी यांनी सडला आहे. हे वास्तव नजरेआड करून समृद्धी येणे शक्य नाही. सरकार चालवणे म्हणजे जास्तीत जास्त नियंत्रणे लादणे, असा आपल्या राजकारण्यांचा समज असतो. यातून भ्रष्ट नोकरशाही निर्माण होते. या वास्तवाचे आत्मपरीक्षण भारतातील नेतृत्वाने केले, तरच काही मार्ग निघेल. आजचे भारतीय नेतृत्व दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभे असताना, मार्गदर्शन मिळेल असा आशेचा किरण कोठे दिसत नाही.

तरी आपण आशावादी असतो. यातूनच तरुणाईत असणारांचे एक नवे, विधायक नेतृत्व निर्माण होईल, अशी आशा धरण्याशिवाय मार्ग नसतो. नेतृत्व आकाशातून पडत नसते. ते समाजाने निर्माण करायचे असते. फक्त उपरोक्त विश्लेषणाप्रमाणे त्याचा व्यक्ती विकास हा शाश्वत मूल्यांवर झालेला असावा लागतो. असे मूल्यधिष्ठित नेतृत्व खऱ्या अर्थाने समाजाचे मार्गदर्शन करू शकते. आजचे नेतृत्व लोकनुयायी, भ्रष्ट व लाचार आहे. चांगल्या नेतृत्वात अप्रियता घेण्याची क्षमता असते. योग्य कारणांसाठी कटु निर्णय घेण्याची शक्ती असते. असा नेता विकासित करू तेव्हा तीच समृद्धीची खरी सुरुवात ठरेल.

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

☆ अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा
☆ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
☆ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा
अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नांव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे महानगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**☆ संपर्क ☆**

कार्यवाह
**विद्या प्रसारक मंडळ**
विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.